दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

नायगांव जुने शाळेचे क्रीडा स्पर्धेत यश

सीरामपूर : तालुक्यातील नायगांव जुने प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरिय व तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश मिळविले आहे.अनिल इन्द्रभान गायकवाड (इ.३ री) याने केंद्रस्तरिय क्रीडा स्पर्धेत लहान गट मुले उंच उडी व धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच त्याने उंच उडी स्पर्धेत तालुक्यात दुसरा क्रमांक पटकाविला. कु.समिक्षा सुभाष तुपे (इ. ४ थी) हिने लहान गट मुली लांब उडी स्पर्धेत केंद्रात तिसरा क्रमांक तर कु.पुजा रमेश भवार (इ. ४ थी) हिने लहान गट मुली धावणे स्पर्धेत केंद्रात तिसरा क्रमांक पटकाविला.या यशाबद्दल विद्यार्थ्यांचा माता पालक मेळाव्यात सरपंच राजाराम राशिनकर, बापूसाहेब लांडे, संपतनाना लांडे, आरोग्यामित्र सुभाष गायकवाड, प्रमोद शेजुळ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश लांडे, पोलीस पाटील राजेंद्र राशिनकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक संतोष बाचमोडे व शिक्षिका सुजाता सोळसे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

* (आठवी) वर्षा * शनिवार दि. १७/०२/२०२४ * वर्ष : २ * अंक : २७ * पाने : ८ * किंमत : ५ रु * मुख्य संपादक- राहुल गजरे * उपसंपादक- राठोड रमेश पंडित * कार्यकारी संपादक-अवधूत शेंद्रे * RNI No : MAHMAR/2020/82242

अजित पवारच राष्ट्रवादीचे दादा

विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा निर्णय





मुंबई : शिवसेनेनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या अपात्रतेबाबतचा फैसला देखील विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस ही उपमुख्यमंत्री अजित पवार यांचीच असल्यावर राहुल नार्वेकर यांनी शिक्कामोर्तब केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक रचना किंवा पक्ष संघटनेवरून कोणता गट हा पक्ष आहे, हे निश्चित होत नाही. त्यामुळे विधिमंडळ पक्षाच्या संख्याबळानुसार अजित पवार गट हाच खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचा निष्कर्ष नोंदवत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निकाल दिला. या प्रकरणात राज्यघटनेतील पक्षांतर बंदीचे १० वे परिशिष्ट लागू होत नाही, असे स्पष्ट करत नार्वेकर यांनी दोन्ही गटाच्या आमदार अपात्रतेच्या याचिका फेटाळून लावल्या.

नार्वेकरांच्या निर्णयाचे अजित पवार गटाने स्वागत केले असून शरद पवार गटाने अध्यक्षांच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे सांगितले. दरम्यान, संविधानातील तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचना, दहाव्या परिशिष्टातील तरतुदी या सर्वांना समोर ठेवून हा निर्णय दिला आहे. संसदीय लोकशाहीला आणखीन मजबूत करण्याचेच काम हा निर्णय करेल, अशी प्रतिक्रिया राहुल नार्वेकर यांनी निकालानंतर व्यक्त केली.

आव्हाड, राऊत संविधानाचे तज्ज्ञ -राहुल नार्वेकर



संविधानातील तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचना, दहावे परिशिष्ट यांचा आधार घेऊनच मी निर्णय दिला आहे. निर्णयाची प्रत पक्षांना दिली आहे. कोणताही असंवैधानिक निर्णय नाही. प्रत्येक निर्णयाची कारणमीमांसाही दिली असल्याची प्रतिक्रिया राहुल नार्वेकर यांनी निकालानंतर दिली. जितेंद्र आव्हाड, संजय राऊत आणि आदित्य ठाकरे हे संविधानाचे तज्ज्ञ आहेत. इतक्या महान व्यक्तींच्या टीकेवर प्रतिक्रिया देऊ शकत नाही, असा टोलाही राहुल नार्वेकर यांनी लगावला. ज्या लोकांना दहाव्या परिशिष्टाबद्दल माहिती नाही ते अशाच टिप्पणी करू शकतात. सर्व मेरिटवर बोलायचे नाही. धृतराष्ट्र आदी टीका करायची, याला काही अर्थ नाही. संसदीय लोकशाहीला आणखीन मजबूत करण्यावेच काम हा निर्णय करेल. पक्षांतर्गत मतभेद आणि पक्षांतर याचा उहापोह करण्यात आला असल्याचेही नार्वेकर म्हणाले.

पक्ष हिरावून घेण्यामागे अदृश्य हात -सुप्रिया सुळे



शरद पवार यांच्या राष्ट्रवादी गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी आपल्या वडिलांनी स्थापन केलेला पक्ष आणि निशाणी हिरावली जाण्यामागे अदृश्य हाताची शक्ती असल्याची प्रतिक्रिया पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली आहे. मात्र आपण निवडणूक आयोगाच्या राष्ट्रवादी पक्ष व निशाणी अजित पवार गटाला देण्याच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. शरद पवार हेच राष्ट्रवादी पक्षाचे संस्थापक, अध्यक्ष होते, आहेत, आणि असतील, असा विश्वास देखील बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. ज्या माणसाने पक्ष उभारला, त्याची निशाणी ठरवली त्याच्याचकडून या दोन्ही गोष्टी हिरावून घेतल्या गेल्यामुळे आम्ही सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. कारण ज्या व्यक्तीने पक्ष उभारला तो पक्ष अन्य कुणाला देण्याचा हा चुकीचा पायंडा पडणार आहे. इतिहास याची नोंद घेणार आहे, अशी उद्विग्नता देखील सुप्रिया सुळे यांनी यावेळी व्यक्त केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शाहीर कलाकारांनी दिलें निवेदन

मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषण घेतावणी - शा.राजेंद्र बावनकुळे

उप मुख्यमंत्री, सांस्कृतिक मंत्री यांना निवेदन देण्यात आले.



दै.जनप्रभात

कन्हान, : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रामटेकच्या दौऱ्यावर असतांना कन्हान रामटेक विधानसभा मतदारसंघाच्या प्रवेशव्दार असल्याने तारसा रोड येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधला प्रसंगी शा.राजेंद्र बावनकुळे यांनी मुख्यमंत्र्यांना शाहीर कलाकार यांच्या प्रमुख मागण्यांबाबत निवेदन दिले. १ फेब्रुवारी २०२४ रोजी मुंबई मंत्रालय येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्यालयात निवेदन दिले. या सोबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शिष्टमंडळ भेटून निवेदन देण्यात आले. तसेच संचालक ,सह संचालक सांस्कृतिक कार्य महाराष्ट्र शासन विभिषण चौरे,श्रीराम पांडे यांना पण विविध मागण्या चे निवेदन देण्यात आले. शिष्टमंडळात शाहीर राजेंद्र भीमराव बावनकुळे नागपूर, भगवान लांजेवार, शाहीर सुभाष गोरे सोलापूर, शाहीर उत्तम गायकर नाशिक, शाहीर गजेंद्र गवई बुलढाणा, शाहीर शिवाजी शिंदे नगर, शाहीर पांडे अकोला, शाहीर बाळासाहेब मलुस्कर पुणे यांच्या उपस्थितीत देण्यात आले. राज्यातील लावू पण बराच कालावधी होऊन गेला. राज्य शासनाने शाहीर कलाकारांच्या प्रश्न मार्गी लावलेला नाही. त्यामुळे राज्यातील शाहीर कलाकार यांच्या मनात तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. शाहीर कलाकार संस्थेची मागणी महाराष्ट्र शासन यांनी विशेष लक्ष देऊन पूर्ण करावी, अशी विनंती आहे. शाहिरांच्या मागण्या पूर्ण नाही झाल्या तर शाहीर कलाकार आमरण उपोषणाला बसणार आहेत. यावेळी शाहीर राजेंद्र बावनकुळे, शाहीर भगवान लांजेवार, चीरकूट पूंडेकर, हरिनाथ लेंडे, पुरुषोत्तम कुंभलकर,जगदीश बाघमारे, श्रावण लांजेवार, सुरेश चावके, मनोज वडे, लूहुरे, नत्थुजी चरडे आदी उपस्थित होते.

मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठीचा सर्वेक्षणाचा अहवाल मुख्यमंत्र्यांना सुपूर्द - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास



दै.जनप्रभात मुंबई दि. १६ : राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्यभरात घेण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. वर्षा निवासस्थान येथे आज सकाळी हा अहवाल सुपूर्द करतेवेळी आयोगाचे सदस्य देखील उपस्थित होते. यावेळी आयोगासह संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा अशा साडे तीन ते चार लाख अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विक्रमी वेळेत सर्वेक्षण केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले. या सर्वेक्षणाबाबत मुख्यमंत्र्यांनी बैठका घेऊन युद्ध पातळीवर हे सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मराठा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगामार्फत २३ जानेवारीपासून राज्यात युद्धपातळीवर मराठा व खुला प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण २ फेब्रुवारी रोजी पूर्ण करण्यात आले. राज्यातील अंदाजे अडीच कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. बाकामी गोखले इन्स्टिट्यूट, आयआयपीएस या नामांकित संस्थेची मदत झाली. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार प्रत्येक गावात दवंडी पिटवून सर्वेक्षणास नागरिकांनी माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले होते, त्यामुळे हे सर्वेक्षण अत्यंत जलदगतीने पार पडले. या कामकाजाकरिता राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त यांना नोडल अधिकारी म्हणून नेमण्यात आले होते. तसेच राज्यातील जमीन अधिग्रहण, जमीन धारणा, जमाबंदी, भूमी अभिलेख, तसेच शासकीय व निमशासकीय नोकरीमध्ये समाजाचे प्रमाण व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रमाण इत्यादी बाबींची प्रत्यक्ष माहिती मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सर्व विभागांच्या सचिवांनी आयोगाला माहिती उपलब्ध करून दिली. तसेच शारीरिक कष्ट करणाऱ्या कामगारांची माहिती सुद्धा आयोगास उपलब्ध करून देण्यात आली.

दिव्यांशू मृत्युप्रकरणी सीआयडी चौकशी व्हावी

दै.जनप्रभात / अतुल दंढारे

नरखेड :- तालुक्यातील सिंजर गावात राहणाऱ्या दिव्यांशू देवेंद्र भिलम या चिमुकल्याचा संशयास्पद मृत्यू होऊन १५ दिवस लोटले आहे. मात्र अद्यापही पोलिस यंत्रणा मारेकऱ्यापर्यंत पोहोचलेली नाही. यामुळे सिंजर गावातील गावकरी संतप्त असून, आता त्यांनी थेट गृहमंत्र्यांकडे सीआयडी चौकशीची मागणी केली आहे.नरखेड तालुक्यातील सिंजर गावात राहणाऱ्या दिव्यांशू देवेंद्र भिलम या साडे तीन वर्षे वयाच्या मुलाचा विहिरीत मृतदेह आढळला. ही घटना १ फेब्रुवारी २०२४ रोजी उघडकीस आली. त्यानंतर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. पण सर्व घटनाक्रम पाहता दिव्यांशूचा मृत्यू नैसर्गिक नाही. तो नक्कीच घातपात असल्याने गावकऱ्यांनी याविषयी उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस यांची भेट घेत सीआयडी चौकशी करण्याची मागणी केली आहे. स्थानिक पोलिसांनी केवळ चौकशीचा देखावा केला. पण ठोस कृती केली नाही. यामुळे दिव्यांशूचे मारेकरी मोकाट फिरत आहेत. हा सर्व प्रकार पाहता दिव्यांशूला आता न्याय मिळेल की नाही, असाही सवाल गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे. चिमुकला दिव्यांशू हा घटनेच्या दिवशी काकाच्या घरी कार्यक्रमासाठी घरून निघाला होता. पण तो काकाकडे पोहोचलाच नाही. त्यापूर्वीच त्याला उचलून मारेकऱ्यांनी संपविले. ज्या विहिरीत दिव्यांशूचा मृतदेह आढळला तिथे जाणे सोपे नाही. आसपास काटे असताना चिमुकला दिव्यांशू तिथे जाणारच कसा, असाही प्रश्न गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे. सीआयडी चौकशीशिवाय न्याय मिळणे कठीण आहे.

भाग ६



चाकूर पंचायत समिती समोरील बेमुदत अमरण उपोषण तात्पुरते स्थगित

विविध मागण्या साठी पंचायत समिती चाकूर समोर बेमुदत अमरण उपोषण

दै, जनप्रभात

उपसंपादक / राठोड रमेश पंडित

चापोली:- चापोली ता चाकूर जि लातूर येथील ग्रा पं गेल्या वर्षभरापासून संपुर्ण जिल्हा भर बनावट सरपंच, विविध अतिक्रमणे व बोगस कामे,भोंगळ कारभाराच्या अनेक तक्रारीवरुन चर्चे त आहे. नवीन सरपंच भालचंद्र चाटे हे होवून आता १४महीने होत आहेत. येथील नागरीकांना पाणी, लाईट, रस्ता या मुलभुत गरजाही याना आता पर्यंत देणे झाले नाही यातच ग्राम पंचायत मार्फत होणारे कामे ही बोगस करून ग्रामविकास अधिकारी, संबंधीत वरीष्ठ अधिकारी, इंजीनियर यांना हाताशी धरून पैसा उचलून पार करण्याचा धडाका यांनी सुरू केला आहे. यातच चापोली ग्रा पं ला अंडरग्राऊंड नाली साठी भरपूर निधी आला आहे ते कामे मोजमाप पुस्तीकेप्रमाने होत नाहीत. मनमानी करून सरपंच, ग्रामविकास अधिकारी, इंजिनिअर व संबंधित अधिकारी हे संगनमत करून कामे करत आहेत. नविन झालेला रस्ता परवानगी नसताना फोडून नालीचे कामे करत आहेत. रस्त्यांचे मोजमाप न करता वाटेल तसे व नागरीकांच्या म्हणण्यानुसार कोठूनही करत आहेत. या बाबत सरपंच भालचंद्र नारायण चाटे , संतोष कुरुळेकर ग्रामविकास अधिकारी व संबंधीत इंजीनियर बोंडवे यांना या बाबत विचारणा केली असता समजून उत्तरे न देता उडवाउडवीची उत्तरे देवून तुम्हाला काय करायचे ते करा कुठेही जा आमचे काहीच वाकडे होत नाही कामे असेच होतील असे बोलल्या मुळे मी दि २३/०१/२०२४ व दि ३१/०१/२०२४ रोजी गटविकास अधिकारी यांचे कडे तक्रार दिली होती आणि माझ्या तक्रारी वरुन दि १५/०२/२०२४ पर्यत कार्यवाही नाही



झाल्यास मी तक्रारदार मुदसद्दीक देशमुख माजी ग्रामपंचायत सदस्य चापोली तथा चाकूर तालूका उपाध्यक्ष शरद पवार गट आपल्या कार्यालया समोर दि १६/०२/२०२४ पासून बेमुदत अमरण उपोषणास बसणार असाही इशारा तक्रारदार यांनी आपल्या निवेदनात दिला होता मात्र मा श्री लोखंडे गटविकास अधिकाऱ्यांनी ही या बाबत काहीच पाऊले उचलली नाहीत या वरून सर्व एकमेकांना सामील असल्याचे दिसून येते आहे. मागे सरपंच भालचंद्र चाटे यांनी सार्वजनिक रस्त्यावर स्वताचे घर बांधकाम केले, ग्रा पं ची गट नंबर २४४मधील ३६ आर जमीन बनावट कागदपत्रे लावून हडप करण्याचा पदाचा गैरवापर करून प्रयत्न सरपंच यांनी केला अशा अनेक तक्रारी, बेमुदत उपोषणे करून ही ग्रामविकास अधिकारी व पंचायत समिती गटविकास अधिकारी यांनी आज पर्यंत थातुरमातुर कागदपत्रे निमित्त मात्र बनवून आम्ही चौकशी केली दाखवून दोषींना आजपर्यंत पाठीशी घातले आहे असे प्रतिनिधी शी बोलताना तक्रारदार मुदसद्दीक देशमुख यांनी सांगितले आज अंडरग्राऊंड नाही व इतर बोगस कामे बाबत मी पंचायत समिती चाकूर समोर मी मुदसद्दीक देशमुख, बाबा सय्यद व माझे सहकारी बेमुदत अमरण उपोषणास बसलो आहे आजचा पहीला दिवस आहे जोपर्यंत सरपंच भालचंद्र चाटे, ग्रामविकास अधिकारी संतोष कुरुळेकर, बांधकाम विभागाचे इंजिनिअर बोंडवे यांच्या वर्षभरातील सर्व कामांची तक्रारींची सखोल चौकशी करून कठोर कारवाई होत नाही तोपर्यंत माझे हे बेमुदत अमरण उपोषण या ठिकाणी सुरूच रहाणार आहे अशी भुमीका उपोषणकर्ते यांची असताना पंचायत समिती चे गटविकास अधिकारी व संबंधित यांनी सायंकाळी ४:०० उपोषणस्थळी उपोषणकर्ते यांची भेट घेवून मागण्या बाबत सविस्तर चर्चा केली व दि २३/०२/२०२४ पर्यत आठ दिवसांत सर्व मागण्या बाबत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल असे लेखी हमी पत्र देवून सध्या चालू असलेले बेमुदत अमरण उपोषण मागे घेण्यात यावे अशी



विनंती केली व आठ दिवसांत ठोस कार्यवाही नाही झाल्यास आपण पुन्हा येथे उपोषणास बसावे असे ही तोंडी सांगितल्याने चालू असलेले बेमुदत अमरण उपोषण तात्पुरते दि २३/०२/२०२४ पर्यत स्थगीत करण्यात येत आहे असे उपोषणकर्ते यांचे कडून जाहीर करण्यात आले आहे. आता या उपोषण व गटविकास अधिकारी चाकूर यांच्या योग्य ती कार्यवाही करण्याच्या लेखी हमी पत्राने चापोली चे बनावट सरपंच, बोगस कामे करण्यास मदत करणारे संतोष कुरुळेकर, संबंधित बांधकाम विभागाचे बोंडवे इंजिनिअर यांचे वर काय कार्यवाही होते की या सर्वांना हे गटविकास अधिकारी चाकूर व संबंधित पांघरुण घालून पाठिशी घालतात या कडे चापोली व परिसरातील जनतेची एकच चर्चा होत आहे व या बेमुदत अमरण उपोषणातील लेखी अश्वासनाकडे लक्ष लागले आहे

जनावरे वाहतुकीच्या तीन गाड्या जुनी कामठी पोलिसांनी पकडल्या

२९ जनावरांना दिले जीवदान,१६ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

दै.जनप्रभात कामठी:-नंदू कोल्हे

भाजी मंडी परिसरातील अवैध कत्तलखान्यात जनावरे कोंबून जात असलेल्या तीन गाड्या जुनी कामठी पोलिसांनी पकडून २९ जनावरांना जीवदान देऊन दोघास अटक करून १६ लाख २५ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केल्याची कारवाई शुक्रवारला सकाळी सहा वाजता सुमारास केली जुनी कामठी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी अब्दुल शाहिद अब्दुल रफिक वय २४ राहणार मोमीनपुरा नागपूर याने टाटा मालवाहू गाडी क्रमांक एमएच ३० बीडी ३९९६ मध्ये १० जनावरे, जाहीर खान बब्बू खान वय ३४ राहणार कामगार नगर नवीन कामठी याने टाटा मालवाहू गाडी क्रमांक एमएच २८ डीबी ४९९८ मध्ये १० जनावरे , तिसरा अज्ञात आरोपी गाडी क्रमांक एमएच ४० बीएल ९१८२ मध्ये नऊ जनावरे शिवनी मध्य प्रदेशातून बिना परवाना अवैधरित्या कोंबून घेऊन कामठी येथील भाजी मंडी परिसरातील अवैध कत्तलखान्यात कत्तल करण्यासाठी घेऊन जात असताना नागपूर जबलपूर- राष्ट्रीय महामार्गावरील कमसरी बाजार शीतलता माता मंदिराजवळ जुनी कामठी पोलिसांनी तिन्ही गाड्या थांबवून तपासणी करीत असताना टाटा मालवाहू योद्धा क्रमांक गाडी क्रमांक एमएच ४० बीएल ९१८२ चा चालक पोलीस दिसताच गाडी थांबवून पसार झाला पोलिसांनी तिन्ही गाड्या तपासले असतात तिन्ही गाड्यांमध्ये २९ जनावरे कोंबून दिसून आली जनावरे भरलेल्या तिन्ही गाड्या जुनी कामठी पोलीस स्टेशनला आणून २९ जनावरे नवीन कामठी परिसरातील गोरक्षनालयात सुरक्षित ठेवण्यात आले दोनही आरोपी विरोधात जुनी कामठी पोलीस स्टेशनला ११ (१) ५ (अ)ब ९(ब)प्राणी संरक्षण अधिनियम ब मोटर वाहन कायदा १७७ नुसार गुन्हा दाखल करुन त्यांचे जवळून जनावराची व तीनही गाड्यांची किंमत एकुण १६ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला दोन आरोपी अब्दुल शाहिद अब्दुल रफिक, जाहीर खान बब्बू खान या दोन्ही आरोपींना कामठी येथील प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे.

GOAL SETTING- ध्येय निश्चितीकरण

आयुष्यात आपण आपली प्रगती ही आपण मिळविलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील गोष्टी वरुन ठरवित असतो. आयुष्य हा एक खेळ आहे (बास्केट बॉलच्या खेळासारखा या खेळामध्ये जो जितके जास्त गोल करतो तो जिंकतो. जर तुम्हाला जिंकायचे असेल तर जास्तीत जास्त गोल करणे गरजेचे आहे.यशस्वी होणारे व्यक्ति वेगळे नसतात तर त्यांचा जीवणाकडे बघण्याचा दृष्टिकोण वेगळा असतो. त्यांनी त्यांना जे जे मिळवायचे होते ते ते मिळविले. कारण आधी त्यांना माहित होते की त्यांना आयुष्यात काय मिळवायचे आहे. आपल्याला आधी ठरविताच येत नाही की आपल्याला आयुष्यात नक्की काय मिळवायचे आहे. मग आपण कसे पुढे जाणार? ज्या गोष्टी आपण मागील पाच वर्षांत मिळवायच्या ठरविल्या होत्या त्या गोष्टीच्या मागे जर आपण चिकाटीने लागलो असता तर कदाचित त्या आपल्याला मिळाल्या असत्या. आपल्याला आयुष्यात नेमके काय मिळवायचे आहे हे ठरवू न शकल्यामुळे आज हे उद्या ते असे करत राहिलो व कोणत्याही गोष्टीमध्ये उच्च यश संपादन करु शकलो नाही.प्रत्येक यशस्वी व्यक्तिला त्याला त्याच्या आयुष्यात पुढे काय करायचे आहे हे दिसत असते. त्याने त्याचे ध्येय ठरविले असते व ते मिळविण्यासाठी त्याची सतत धडपड चालूच असते. त्याला स्वतःला ध्येय गाठण्याकरिता कोणत्याही बाह्य प्रेरणेची गरज नसते. ते ध्येय गाठल्यानंतर मिळणारा सुखद संवेदना त्याच्या प्रत्येक शरीरामधील प्रत्येक रोमा रोमामध्ये तो अनुभवत असतो व ध्येयाप्रति वाटचाल करत असतो. ध्येय प्रेरणेबाबत उदा. विद्यार्थ्यांना अभ्यास करावा असे खूप वाटते परंतू पुस्तक हातात घेतले की झोप येते. यामध्ये त्यांना हवी आहे प्रेरणा अभ्यास करण्याची. जर त्यांनी एक असा फोटो तयार केला ज्यामध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री त्यांचे राज्यात गुणवत्ता यादीत प्रथम आल्याबद्दल अभिनंदन करत आहेत आणि हा फोटो मोठ्या फ्रेममध्ये घरातील प्रत्येक रुममध्ये लावला तर त्याला पूर्वी इतकीच झोप येईल का? नक्कीच झोप खूप कमी होईल अभ्यासाची गती वाढेल प्रत्येक यश संपादन करणाऱ्या व्यक्तिला यश संपादन करण्याच्या आधीच त्याने यश संपादन केले आहे असे बघता येत होते. अमिताभ बच्चन ला आपण सुपर स्टार झालो आहोत, धिरुभाई अंबानी ला आपण एक मोठा उद्योगपती झालो आहोत, सचिन ला आपण एक उत्कृष्ट क्रिकेटर झालो आहोत असे बघता येत होते व हीच एक गोष्ट त्यांना सारखे काम करत राहण्यासाठी प्रेरणा देत होती. तो रात्रंदिवस काम करु शकतो तो त्याच्या ध्येयाप्रति एकनिष्ठ असतो तो त्याला ज्या गोष्टी मिळवायच्या आहेत त्या करीता ज्या प्रकारचे काम करणे गरजेचे आहे. त्या प्रकारचे काम तो दिवसरात्र करु शकतो. आपल्याला जर असे दिवस रात्र काम करता आले तर आपण सुद्धा यशस्वी व्यक्तीच्या रांगेमध्ये बसू शकू. आता आपण समजावून घेऊया कि या यशस्वी लोकांनाच त्यांच्या ध्येयाप्रति एकनिष्ठ राहून कसे बरे काम करता आले. यामध्ये कोणत्या तंत्राचा त्यांनी वापर केला काय. त्यांनी इच्छा शक्ती वापरली ? बरेचदा आपण एक म्हण ऐकली असेल थहशअॅश ळी ुळश्रश्र हिशअॅश ळी ु, परंतू मित्रांनो ही गोष्ट सत्य नाही. प्रत्येक व्यक्तीला वाटतं की आपण खूप पुढे जावे, खूप यश संपादन करावे. प्रत्येक विद्यार्थ्याला वाटते की भरपूर मार्कस् मिळावेत. परंतु म्हणून काय सर्वांना खूप यश संपादन करता येते? सर्व विद्यार्थाना खूप चांगले मार्क मिळविता येतात? त्या प्रश्नावर ही मला माझे काही मित्र उत्तरे देतात की इच्छा नको तर प्रबळ इच्छा असावी लागते. आता तुम्ही एक प्रात्यक्षिक करूनच बघा. कल्पना करा. तुम्ही तुमच्या घरी गेलेले आहात. घरामध्ये स्वयंपाक घरात गेलात. तेथे एक फळाची टोपली ठेवलेली दिसत आहे. (कल्पना करा) टोपली मध्ये रसरशीत लिंबू आहेत. तुम्ही त्या लिंबू मधील एक लिंबू हातात घेत आहात आणि आता एक धारदार चाकू शोधत आहात. चाकू सापडला आहे. आता या चाकूने या लिंबुचे दोन भाग करत आहात. लिंबूचे दोन भाग डोळ्यासमोर बघत आहात. आता यामधील एक भागावर मिठ टाकत आहात. मिठ टाकल्यानंतर आता हा अर्धा लिंबू तोंडामध्ये पिळत आहात. तोंडात लिंबूचा आंबट गोड रस पडत आहे. ती चव तुम्ही अनुभवत आहात. शेजारीच आंबट गोड चिंचा आहेत. पूर्ण चिंच तुमच्या डोळ्यासमोर दिसत आहे ही तुम्ही दाताने तोडत आहात व चव तोंडामध्ये अनुभवत आहात. बघा, मी आता जी गोष्ट वर बघण्यासाठी सांगीतली (कल्पना करण्यासाठी) जर तुम्ही हुबेहूब कल्पना केली असेल तर नक्कीच तुमच्या तोंडाला पाणी सुटले असेल. विचार करा जर तुम्ही कितीही प्रबळ इच्छा केली असती तरी तुमच्या तोंडाला पाणी सुटले असते का? मित्रांनो इच्छा शक्तीपेक्षा सुद्धा जास्त ताकद कल्पना शक्तीमध्ये आहे. आणि हीच कल्पनाशक्ती या यशस्वी लोकांनी स्वतःच्या विकासाकरीता वापरली होती. ज्या गोष्टी त्यांना मिळवायच्या आहेत त्या गोष्टी त्यांनी आधीच मिळविलेल्या आहेत असे डोळ्यासमोर चित्र उभे केले व त्यामुळे त्यांना त्या मिळविता आल्या.

लेखक:-
जगदिश वांदिले सर
संचालन:- दै. जनप्रभात ता. प्र. अमोल झाडे समुद्रपुर



जैतापूर येथे दरवर्षी प्रमाणे होणार शिवजयंती उत्सव साजरा.

दै,जनप्रभात राजापूर
ता.प्रतिनिधी/प्रशांत पोवार

जैतापूर शिवजयंती उत्सव समिती तमाम शिवभक्त आणि जय भवानी नवरात्र उत्सव मंडळ मांजरेकर वाडी जैतापूर याच्या सयुक्त विद्यमानाने यावर्षीही शिवजयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे शिवजयंती निमित्त १९ फेब्रुवारी रोजी भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर स्पर्धा ही एक ग्रामपंचात स्वरूपात होणार असून तालुका राजापूर जिल्हा रत्नागिरी लांजा पर्यंत मर्यादित होणार आहे प्रवेश फी-५०० असून प्रथमक्रमांक-७७७७७पारितोषिकव आकर्षकचषक द्वितीय क्रमांक -५५५५५ पारितोषिक व आकर्षक चषक व इतर वयक्तिक बक्षीसे असून सायंकाळी ६ वाजता जैतापूर जैतापूर एसटी स्टॅण्ड जवळ हणार आहे आपला सहभाग नोंदवण्यासाठी खालील नो वर संपर्क करा
पंकज पाटील ९८२३७६५९७२
साईराज करगुटकर ९१३०६८६२८२
सागर करगुटकर ९२७२९२३२४४
विनायक शीर्षेकर ७५०७८५२२०६

दि.१७ ते २३ फेब्रुवारी २०२४पर्यंत प्रकाशनार्थ..

भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहुजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी "मरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठीच"अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी अनेक देशभक्तांना आपल्यातील युद्धकला शिकवली. अशा महान क्रांतिगुरुची महती त्यांच्या स्मृतिदिनी श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी वर्णन करीत आहेत... संपादक.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात लहुजींचे पूर्वज पराक्रम गाजवीत. साळवे घराणे सशस्त्र विद्येमध्ये निपुण व तरबेज होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकाळात लहूजींच्या पूर्वजांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या कार्यकाळात साळवे घराण्याची योग्यता ओळखून पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी लहुजी साळवे यांच्या आजोबांकडे सोपवली होती. पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणासाठी साळवे घराण्यातील अनेक वीरपुरुषांनी आपल्या प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी लहुजींच्या पूर्वजांना राऊत या पदवीने गौरविले होते.

वस्ताद लहुजी राघोजी साळवे हे खरेतर लहुजी वस्ताद नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावातील एका कुटुंबात झाला. मातंग समाजात जन्माला आलेल्या लहुजींना युद्धकलेचे प्रशिक्षण त्यांच्या घरातील वीर पुरुषांकडून मिळाले होते. लहुजींच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे व आईचे नाव विठाबाई होते. लहुजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे अतिशय पराक्रमी पुरुष होते. युद्ध कलेमध्ये त्यांचा कोणीही हात धरू शकत नसे. वाघाबरोबर लढाई करण्याच्या पराक्रमामुळे लहुजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे त्याकाळी प्रसिद्ध होते. एकदा त्यांनी वाघाबरोबर युद्ध केले आणि जिवंत वाघाला खांद्यावर घेऊन पेशव्यांच्या राजदरबारी सादर केले होते. असे त्यांनी आपल्या प्रचंड शक्तीचे प्रदर्शन केले होते.

पुढे दि.५ नोव्हेंबर १८१७ला पेशव्यांचे इंग्रजांसोबत खडकी येथे तुंबळ युद्ध झाले. तब्बल १२ दिवसांपर्यंत राघोजी व २३ वर्षे वयाच्या लहुजी यांनी आपल्या मावळ्यांना सोबत घेऊन इंग्रजांविरुद्ध निकराचा लढा दिला. लहुजींचे वडील राघोजी साळवे बाऱ्याच्या वेगाप्रमाणे शत्रूवर तुटून पडले होते. ते तलवारीचे सपासप वार करत शत्रुंना जमिनीवर लोळवत होते. अखेर या संकटातून बाहेर पडण्यासाठी घाबरलेल्या इंग्रजांनी एकत्रित वार करुन राघोजींना धारातीर्थी पाडले. राघोजी या युद्धात इंग्रजांच्या हातून लहुजींच्या समोरच शहीद झाले. त्यावेळी पेशव्यांचा पराभव झाला. पुढे इ.स.१८१८मध्ये मराठा साम्राज्याचा भगवा ध्वज शनिवारवाड्यावरुन हटवून तेथे इंग्रजांचा युनियन जॅक फडकला. या पराभवाने लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्यप्राप्तीची ज्वाला भडकली. स्वातंत्र्यप्रेम, देशभक्ती, देशप्रेम यांनी झपाटलेले लहुजी आपल्या वडिलांच्या मृत्यूच्या दुःखातून सावरले. आपल्या वडिलांना आपल्या डोळ्या देखतच शहीद झालेले पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहुजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी "मरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठी" अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी आपल्या वडिलांची समाधी उभारली. ही समाधी अजूनही पुणे-शिवाजी नगरजवळच्या बाकडेवाडी येथे आहे.

क्रांतिगुरु लहुजी हे दांडपट्टा चालवणे, तलवारबाजी, घोडेस्वारी, बंदूक चालवणे व निशाणेबाजी अशा सर्व युद्धकला कौशल्यांमध्ये निपुण होते. त्यांचे पिळदार शरीर व उभरलेली छाती पाहून शत्रूला सुद्धा घाम फुटत असे. जीवघेण्या शस्त्रांबरोबर ते अगदी एखाद्या खेळण्याप्रमाणे खेळत असत. आपल्या वडिलांचा मृत्यू व इंग्रजांनी केलेला पराभव त्यांना असह्य झाला. पराक्रमी घराण्यातील लहुजींनी इंग्रजांवर मात करण्यासाठी म्हणजे पर्यायाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी मवाळपंथी नव्हे तर जहाल क्रांतिकारक निर्माण करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी आपल्या अंगी असलेले युद्धकलेचे शिक्षण तरुणांना देण्याचे ठरविले. म्हणून त्यांनी इ.स.१८२२मध्ये पुण्यातील रास्ता पेठ येथे देशातील पहिले युद्ध कलाकौशल्य तालीमकेंद्र उघडले. ते नाना रास्ते सरदार यांच्या हस्ते सुरु केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्वच समाजातील युवक तालीम घेण्यासाठी येऊ लागले. यात प्रामुख्याने बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, चापेकर बंधू, क्रांतिभाऊ खरे, क्रांतिवीर नाना दरबारे, रावबहादूर सदाशिवराव गोवंडे, नाना मोरोजी, क्रांतिवीर मोरो विठ्ठल बाळवेकर, क्रांतिवीर नाना छत्रे, महात्मा जोतीराव फुलेंचे सहकारी बाळवेकर आणि परांजपे हे देखील लहुजी साळवे यांच्या आखाड्यातच शिकले. इ.स.१८४८ साली लहुजींच्या याच तालमीत सावित्रीमाई फुले यांची पहिली मुलींची शाळा सुरू झाली होती. म्हणून ते आद्य महाक्रांतिगुरू ठरतात, यात मुळीच शंका नाही.

दि.२० जुलै १८७९ रोजी इंग्रजांनी वासुदेव बळवंत फडके यांना देवरनावडगा मुक्कामी रात्री झोपेत असताना पकडले व त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. दि.७ नोव्हेंबर १८७९ रोजी वासुदेव फडके यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. हे ऐकून लहुजींच्या मनावर खूप मोठा आघात झाला. अवघ्या तेरा महिन्यांनी म्हणजेच दि.१७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्याच्या संगमपुराच्या परिसरात एका झोपडीवजा घरामध्ये लहुजी साळवेजींची प्राणज्योत मालवली. त्याबरोबरच एका महा क्रांतिपर्वाचा शेवट झाला. त्यांची समाधी पुण्यातील संगमवाडी येथे आहे. !! आद्य महाक्रांतिगुरु लहुजींना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !!

श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.
मु. पो. ता. जि. गडचिरोली
फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३.
इमेल- पळझेवशज्ञअॅलीहपरर्झीरअॅसारळश्र.लेा

खैरात ..

मार्ग मिळे चांगला
पुरस्कारांची खैरात
कृणाकुणाचागौरव
जोशात चाले वरात

वेळचांगली साधली
इलेक्शनबाईदारात
मतप्रवाह वळवावा
जागा पाडा पदरात

निवडसमिती स्मार्ट
सुकाणूं असे हातात
निवडाप्रभावी कुणी
फरक पाडेलं मतात

गौरव उचीत वर्गाचा
पहा धर्म पंथ जात
एकदगड कैक पक्षी
प्रतिपक्षा करा मात

निवडनको वादग्रस्त
उलट होईलं आघात
सर्व मान्य निवडला
पाळावा योग्य प्रघात

अवघड प्रश्न सुलभ
साध्य करा एकसाथ
पुरस्कारमुर्तींचा राहे
डोक्यावरी नीत हात

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.
www.kavyakusum.com

राजापूरची सुकन्या शांभवी दाते हीचा पुणे महापौरांच्या हस्ते करण्यात आला सत्कार



दै,जनप्रभात /प्रशांत पोवार

अमृतमहोत्सवी प्रजासत्ताकदिनी दिल्ली येथे कर्तव्यपथावर भव्य परेडचे आयोजन करण्यात आले होते. डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या या परेडमध्ये, 'वंदेभारतम' या कार्यक्रमात भरतनाट्यम नृत्य सादर करण्यासाठी पुण्यातील गुरू सुचेता भिडे यांच्या कलावर्धिनी नृत्य संस्थेच्या आठ नृत्यांगनांना निमंत्रित करण्यात आले होते. तालुका राजापूर, जिल्हा रत्नागिरी येथील शांभवी दाते हिच्यासोबतच पुण्यातील अनुजा हेरेकर, ऋचा देशमुख, श्रावणी साने, सृष्टी अवधुतकर, प्राजक्ता राजूरकर, संपदा कुंटे, फाल्गुनी ओझा या नृत्यांगनांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता.

राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांच्यासमोर आपली कला सादर करून महाराष्ट्रासह रत्नागिरी - राजापूरचे आणि पुण्यनगरीचे नाव उंचावणाऱ्या या कलाकारांचा समस्त पुणेकरांना सार्थ अभिमान आहे, अशी भावना व्यक्त करून या नृत्यांगनांचा पुण्याचे महापौर (२०१९-२०२२) आणि भाजपा महाराष्ट्र सरचिटणीस मुरलीधर मोहोळ यांनी त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात 'सावरकर एक अभिनव दर्शन' हा कथासंग्रह भेट देऊन सत्कार केला. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे नियोजन रत्नागिरीचे, पुण्यात वास्तव्यास असणारे युवा कार्यकर्ते वरुण लिमये यांनी भाजपा पुणे युवा मोर्चा सरचिटणीस दुष्यंत मोहोळ यांच्या समन्वयाने केले होते. भविष्यात सांस्कृतिक क्षेत्रात लागणाऱ्या कार्यक्रमात आपल्या वतीने संपूर्ण सहकार्य आणि पाठिंबा असेल असे यावेळी बोलताना मोहोळ यांनी सांगितले. दरम्यान विशेष कामगिरीबद्दल राजीव लिमये यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

पूर्णा नगरपालिकेवर घागर मोर्चा

दै, जनप्रभात अरविंद कांबळे परभणी.

पूर्णा, शहरांमध्ये मागील दहा ते पंधरा दिवसापासून पाणीपुरवठा होत नसल्यामुळे पुरणेकरांना पाण्यासाठी वन वन फिराबे लागत आहे. याकडे पूर्णा नगर पालिका प्रशासनाने आठ दहा ते पंधरा दिवस झाले लक्ष नाही दिल्यामुळे आज रोजी पूर्णा शहरात नगरपालिकेवर घागर मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा डेमोक्रेटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया च्या वतीने काढण्यात आला यावेळी मुख्याधिकारी साहेब नसल्यामुळे हे निवेदन केशव धोंडे प्रशासकीय अधिकारी यांना देण्यात आले. यावेळी त्यांनी शनिवार रविवार रोजी पूर्णा शहराला सुरळीत पाणीपुरवठा होईल असे सांगितले. या निवेदनावर जिल्हा सचिव नसीर शेख, प्रबुद्ध काळे ,सुबोध खंदारे वैभव जाधव, निशांत डंके सुमित गायकवाड, तुषार इंगोले ,अभिजीत बलखंडे अमोल पटेकर, सुकेशनी भुजबळ ,छाया खरे सावित्रीबाई कांबळे, अरुणाबाई जाधव ,जनाबाई जोंधळे, यांच्यासह मोठ्या संख्येने शहरातील महिला घागर घेऊन मोर्चा सहभागी झाल्या होत्या.



सेवालाल जी ..

सेवालाल महाराज
सार्थ आधुनिक संत
बंजारा समाज सारा
उपकृत होई अत्यंत

गोरगरीबांत मिसळे
असूनही गर्भ श्रीमंत
बावीस वचने त्यांची
मार्गदर्शी असे अनंत

भटक्या जाती साठी
झगडले ते अविश्रांत
पर्यावरणाची सुरक्षा
आवडता त्यांचा प्रांत

समाजव्यसनाधीनता
बाटे सदोदित रे भ्रांत
अलिखीत विचार ते
भरकटले जे अशांत

पर्यावरणावर ठेवावी
स श्रध्दा नीत नितांत
अंधश्रध्दा ना मनात
असत्य वचन धादांत

क्रांतीकारी युगपुरुष
आराध्य दैवत महंत
कमीमाहिती पिढीला
खरोखर उणीव खंत

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६
www.kavyakusum.com

राजापूर तालुका कुणबी सहकारी पतपेढी मर्यादित राजापूर सलग सहाव्यांदा "राज्यस्तरीय बँको ब्ल्यू रिबन" पुरस्काराने सन्मानित.

दै,जनप्रभात राजापूर
ता.प्रतिनिधी/प्रशांत पोवार

राजापूर तालुका कुणबी सहकारी पतपेढी मर्यादित राजापूर सलग सहाव्यांदा प्रथम क्रमांकाच्या राज्यस्तरीय ब्ल्यू रिबन २०२३ पुरस्काराने गौरविण्यात आले.मंगळवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ रोजी दमण येथे हा पुरस्कार वितरण सोहळा सन्मा.मधुकरराव चौधरी (मा. सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते संपन्न झाला. सन २०२३ मध्ये संस्थेने सभासद ,शेअर्स, निधी, गुंतवणूक, ठेव, कर्ज, खेळते भागभांडवल, यामध्ये केलेली वाढ , वसुलीचे आदर्श प्रमाण, नेट एनपीए ० टक्के, सातत्याने संस्थेने मिळवलेला ऑडिट " अ "वर्ग , आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सभासदांना देण्यात आलेल्या आरटीजीएस, एन ड एफ टी , एस एम एस सारख्या सेवासुविधा, मिनी ए टी एम, संस्थेच्या शाखा व त्याचे योग्य व्यवस्थापन व संस्थेने जोपासलेली सामाजिक बांधिलकी या सर्व निकषाच्या आधारावर संस्थेने हा मानाचा पुरस्कार मिळवला आहे.

दमण येथे राज्यस्तरीय सहकार परिषद २०२४ चे आयोजन केले होते त्या मध्ये "बँको ब्लू रिबन पुरस्कार" सन्मा. मधुकरराव चौधरी (मा. सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संस्थेचे संचालक श्री. रमेश सुद,मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जितेंद्र पाटकर यांनी तो स्वीकारला, यावेळी पाली शाखेचे प्र. शाखाधिकारी श्री. प्रकाश भावळे, प्रधान कार्यालयातील लिपिक श्री. जितेंद्र मांडवे उपस्थित होते. या यशाचे श्रेय संस्थेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार , हितचिंतक व संस्थेचे चेअरमन सन्मा. प्रकाश मांडवकर साहेब व त्यांना साथ देणारे माजी संचालक मंडळ व विद्यमान संचालक मंडळ, संस्थेचे कर्मचारी वृंद, पिग्मी एजंट, आर डी एजंट , सी ए. एन.एन.पाटणकर, कायदेविषयक सल्लागार एस. एम.देसाई या सर्वांचे मोठे योगदान असल्याचे संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जितेंद्र पाटकर यांनी सांगितले. सलग सहाव्या वर्षी राज्यस्तरीय "बँको ब्लू रिबन पुरस्कार" मिळाल्या बद्दल राजापूर तालुका कुणबी सहकारी पतपेढी वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणांच्या समर्थनार्थ पूर्णा शहरात रास्ता रोको





दै,जनप्रभात

अरविंद कांबळे / परभणी पूर्णा :–आज सकल मराठा समाजाच्या वतीने पुर्णा टि पॉईंट येथे पूर्णा तालुक्यातील ताडकळस ,गौर ,चुडावा,अशा विविध ठिकाणी रास्ता रोको करण्यात आले.संघर्ष योद्धा मा. मनोज जरांगे पाटील यांचा उपोषणाच्या समर्थनार्थ आकरा वाजता रास्ता रोको करन्यात आला. हा रास्ता रोको आंदोलन मराठा समाजच्या मागन्या संदर्भात सरकारणे जो सगळे सोयरे आद्यादेश काढलाय त्याचे कायद्यात त्वरीत रुपांतर करावे आणी मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ द्यावा आणी मागन्या मंजूर कराव्या या साठी शेकडो तरुनांसह रास्ता करन्यात आला हा रास्ता रोको शांततेच्या मार्गाने केला सदर आंदोलना वेळी अँबुलन्स व आत्यावशक वाहनांना रस्ता कुरुन दिला. कुनी पेशंटची गाडी आसेल तर तीला देखील सोडन्यात आले सदर आंदोलन ३० ते ४५ मीणीटे चलले. आणी मा तहसीलदार पुर्णा यांना निवेदन देण्यात आले या निवेदनावर साहेबराव कल्याणकर, कपील किरडे, हारीभाऊ कदम, संजय कदम ,गोपी ईंगोले ,पवन बोबडे ,गणपत कदम, रमाकांत कऱ्हाळे गणेश बूचाले, सूंदर भोसले सतीश सातपुते ,शरद कदम ,ब ईतर शेकडो समाज बांधव हजर होते. यावेळी पोलीस बंदोबस्त मा पो नी गोबाडे, पो ऊ नि कऱ्हाळे ,पो शी लांडगेवाड, बाघमारे , यांनी चौक बंदोबस्त ठेवला.

ढाणकी बिटरगाव पोलीस स्टेशनचे कारभार कोणाकडे ?ठाणेदार नावालाच?

(''तू दळ माझे आणि मी दळण गावच्या पाटलाचे'' या मणी प्रमाणे ढाणकी चा कारभार चालू असल्याची चर्चा)



दैनिक जनप्रभात

ढाणकी : सीमा गायकवाड उमरखेड तालुक्यातील ढाणकी हे ठिकाण मोठी बाजार पेठ म्हणून प्रसिद्ध आहे. गेल्या काही महिन्यांपासून ढाणकी अवैध मटका जुगार धंदे सुरु झाले आहे. या अवैध मटका जुगार धंद्यांमुळे अनेक संस्कारांची राखरांगोळी झाली आहे. यावर आवर घालण्यासाठी ठाणेदारच उपलब्ध नाही.ढाणकी बिटरगाव पोलीस स्टेशन ला ठाणेदार असून सुद्धा ठाणेदार चे काम तेथील दोन कर्मचारी (क्राईम विभाग व गाडी ड्राइवर)चालवतात अशी चर्चा आहे . गेल्या काही महिन्यात कमी गुंतवणूक करून जास्त नफा कमावण्याच्या मानसिकतेमुळे अवैध धंद्याकडे अनेकांचा कल नव्याने वाढला आहे. त्याचाच फायदा घेत शहरात अशा धंद्याकडे तरुणांचा वाढलेला कल आणि पोलिस विभागाकडून त्याकडे करण्यात येणारे दुर्लक्ष यामुळे अवैध धंद्यांना जणू मोकळे रानच मिळाले आहे.ढाणकी शहरात सहज उपलब्ध होतो गुटखा, दारू, मटका! पण अन्न व औषध तसेच पोलीस प्रशासनाच्या डोळ्यावर पट्टी?बांधून असल्यागत वाकडे ''रोज मरे त्याला कोण रडे ''याप्रमाणे दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे । पोलीस अधिकाऱ्यांना छोटे-मोठे चोर सापडतात! पण मटका,जुगार, किंग कधीच सापडत नाहीत..!! कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणे, त्याचबरोबर अवैधधंद्यांना आळा घालणे व त्यावर वारंवार कारवाई करून पोलिसांचा धाक कायम ठेवणे, हे पोलिसांचे काम आहे. परंतु, ढाणकी शहरात अवैध धंद्यांना ऊत आला असून, या अवैध धंद्यांना कुणाचे अभय आहे? आणि महिनाकाठी चालणारे कलेक्शन कुणाच्या खिशात जाते? अशा प्रश्न सुजान नागरिक करताना दिसत आहे . आता ढाणकी शहरातील अवैध धंद्यांना पोलिसांनीच नाहरकत प्रमाणपत्र दिला की काय, असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. भुसार , किराणा किंवा इतर धंद्यांवर दहा वर्षांत जेवढा पैसा कमावता येणार नाही, तेवढा पैसा अवैध धंद्यात केवळ दोन ते तीन वर्षांत कमावता येतो, असा त्यांचा समज आहे. त्यामुळे अधिक पैसा कमावण्याच्या लालसेने उदरनिर्वाहाचे साधन झाले आहे. मटका, जुगारात तरुणांना एक रुपयात शंभर रुपये मिळवता येत आहेत क्रमांकाच्या अंदाजावर आकडेमोड करून सट्ट्याचे गणित मांडले जात आहे, मात्र या नादात पैसा मिळवण्यापेक्षा गमावणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यातूनच कर्जबाजारीपणा आणि नशेच्या आहारी जाणारे तरुण अनपेक्षितपणे गुन्हेगारीकडेही वळत आहे. या अवैध धंद्याच्या नादी लागून कित्येक तरुण दिवसभर आकडेमोडीच्या गणिताचा अभ्यास करीत असतात. या अवैध धंद्यांनी कित्येक कुटुंब उद्धस्त केले आहेत, तरीही या धंद्याच्या नादी लागणाऱ्यांची संख्या कमी झालेली नाही. या व्यवसायाबद्दल वृत्तपत्र मध्ये प्रसारित करून सुद्धा हे व्यवसाय कोणालाही न जुमानता पोलीस प्रशासना च्या आशिर्वादामुळे चालवण्यात येत आहे . याचा जिल्हा पोलिस अधीक्षक साहेब यांनी शोध घेण्याची गरज आहे.

आठ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकाची पूर्वतयारी करण्याचे काम प्रशासनाने घेतले हाती

दै,जनप्रभात राजापूर
ता.प्रतिनिधी/प्रशांत पोवार

राजापूर, - विविध कारणांमुळे गेल्या काही महिन्यांपासून रिक्त असलेल्या तालुक्यातील सतरा ग्रामपंचायतींच्या २२ जागांसाठी पोटनिवडणूका आणि वर्षभराच्या कालावधीमध्ये मुदत संपत असलेल्या आठ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांची पूर्वतयारी करण्याचमे काम प्रशासनाने हाती घेतले आहे. या संभाव्य निवडणूकीच्या अनुषंगाने काल (ता.१४) प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आल्याची माहिती येथील महसूल प्रशासनाकडून देण्यात आली. अंतिम मतदार याद्या तयार करण्याच्या कामामुळे ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक आणि पोटनिवडणूकांचे ढोल आतापासूनच वाजू लागले आहेत. निवडणूकीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार याद्या त्या-त्या ग्रामपंचायतीच्या कार्यालयांमध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यावर येत्या मंगळवार (ता.२०) पर्यंत हरकती दाखल कराव्याच्या असून आलेल्या हरकती निकाली काढून येत्या शुक्रवारी (ता.२३) अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती येथील महसूल प्रशासनाकडून देण्यात आली. विविध कारणांमुळे रिक्त असलेल्या जागांसाठी पोटनिवडणूका आणि वर्षभराच्या कालावधीमध्ये मुदत संपत असलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांच्या अनुषंगाने पूर्वतयारीचे काम प्रशासनाकडून हाती घेण्यात आले आहे. त्यामध्ये तालुक्यातील संभाव्य सार्वत्रिक निवडणूका होणार्या आठ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. तर, सतरा ग्रामपंचायतींच्या बावीस जागा गेल्या काही महिन्यांपासून विविध कारणांमुळे रिक्त राहीलेल्या आहेत. या संभाव्य पोटनिवडणूक आणि सार्वतत्रिक निवडणूकांचा कार्यक्रम अद्याप जाहीर झालेला नसला तरी, या निवडणूकांच्या अनुषंगाने अंतिम मतदार याद्या तयार करण्याचे काम प्रशासनाकडून हाती घेण्यात आले आहे. त्यानुसार त्या-त्या ग्रामपंचायतींच्या कार्यालयांमध्ये प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या असून प्रसिद्ध मतदारयाद्यांबाबत हरकती वा सूचना असल्यास त्या निर्धारीत कालावधीमध्ये नोंदवाव्यात असे आवाहन महसूल प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

सार्वत्रिक निवडणूका होणार्या संभाव्य ग्रामपंचायती
कणेरी, शेढे, कोंड्येतर्फ राजापूर, भू, तेरवण, खिणगिणी, दसूर, पेंडखळे

पोटनिवडणूकीच्या संभाव्य ग्रामपचायती आणि जागा
कोळवणखडी : २, नाणार –१, झर्ये : २, वडदहसोळ : १, येळवण : १, वाल्ये : २, पांगरीखुर्द : २, रायपाटण : १, कोंड्येतर्फ राजापूर : २, हातिवले : १, तळगाव : १, खरवते : १, मोसम : १, केळवली : १, माडबन : १, भालावली : १, ससाळे : १

सुन्नी दावते ईस्लामी शाखा राजापूरच्या वतीने रविवारी राजापुरात सुन्नी ईज्तीमाचे आयोजन विद्यार्थी व पालकांसाठी स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबीराचेही आयोजन

दै,जनप्रभात
ता.प्रतिनिधी/प्रशांत पोवार



राजापूरः- सुन्नी दावते ईस्लामी शाखा राजापूर यांच्या वतीने रविवारी १८ फेब्रुवारी रोजी सुन्नी ईज्तीमाचे आयोजन करण्यात आले आहे. राजापूर शहरातील पाटील मळा मैदानावर यशोदिन सृष्टी सभागृहात सकाळी १० ते रात्री १० या वेळेत हा ईज्तीमा होणार आहे. याप्रसंगी या ईज्तीमा कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यार्थी व पालकांसाठी स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबीराचेही आयोजन करण्यात आले आहे. याच ठिकाणी सकाळी १०.३० ते दुपारी १२. ३० या वेळेत हे मार्गदर्शन शिबीर होणार आहे. या स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबीरात विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षांची तयारी कशी करावयाची, विविध प्रकारच्या परिक्षा व मुलाखतींना कशा प्रकारे सामोरे जायचे याबाबत तज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. तरी या शिबीराचाही विद्यार्थी व पालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सुन्नी दावते ईस्लामी राजापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. सुन्नी दावते ईस्लामी शाखा राजापूर यांच्या वतीने रविवारी होत असलेला हा १९ वा ईज्तीमा असून या ईज्तीमामध्ये महंमद शाकिर नूरी, महंमद रिजवान खान व सय्यद अमिनुल काद्री हे मार्गदर्शन करणार आहेत. या ईज्तीमाची सांगता जगामध्ये शांतता नांदू दे अशी प्रार्थना करून होणार आहे. या ईज्तीमाला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन सुन्नी दावते ईस्लामी शाखा राजापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

घेतलेले कर्ज न भरल्याने सहा महिन्यांचा कारावास बनोटी येथील गणेश बिगर शेतकरी पतसंस्था प्रकरण

दै.जनप्रभात वरठाण ता १६ प्रतिनिधी.....गणेश बिगर शेतकरी पतसंस्थेचे थकबिलेले कर्ज नांदगाव (ता. सोयगांव) येथील कर्जदाराच चांगलेच महागात पडले. सोयगाव न्यायालयात दाखल याचीकेत कर्जदारास कर्ज रक्कम व्याजासह भरण्यासह सहा महिन्याचा कारावास, श्री गणेश ग्रामीण बिगर शेती पतसंस्था बनोटी (ता.सोयगांव) येथील पतसंस्थेकडुन नांदगाव येथील बद्रिनाथ महारु राठोड यांनी ३५००० हजार रुपये कर्ज घेतले होते. कर्जाची परतफेड न केल्याने श्री. गणेश ग्रामीण बिगए सहकारी पतसंस्था मर्या बनोटी यांच्या मार्फत सिताराम भावडू खैरनार यांनी आरोपी बद्रीनाथ महारु राठोड , रा. नादगांव तांडा, ता. सोयगाव, जिल्हा संभाजीनगर येथील इसमाविरुद्ध मा. प्रथमवर्ग न्यायदंगधिकारी सोयगांव यांच्या न्यायालयात १३८ छ. ख अलीं प्रमाणे आरोपी बद्रीनाथ राठोड यांनी घेतलेले रुपये ३५०००/- कर्जाची परतफेड केली नाही म्हणून गुन्हा दाखल केला.रोजी. मा प्रथमवर्ग न्यायाधिश आर एन पाठक यांनी आरोपीस या प्रकरणी दोषी ठरवून सहा महिने कारावास आणि रुपये ७२,४९५/- भरपाई म्हणून फिर्यादीस देण्याचे आदेश. भरपाई न दिल्यास पुन्हा महिन्याची साधा कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या महाराष्ट्र महिला प्रदेश उपाध्यक्षपदी सौ जयश्री अशोक घोडके यांची निवड....

दै.जनप्रभात
गितांजली तव्हाळे / बीड:- महाराष्ट्र महिला प्रदेश उपाध्यक्ष समाजातील प्रत्येक घटकांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर युवा ग्रामीण पत्रकार संघ राष्ट्रीय अध्यक्ष गणेश रामराव कचकलवार यांनी सौ. जयश्री अशोक घोडके राहणार बीड जिल्हा यांची युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या महिला आघाडी प्रदेश उपाध्यक्ष पदी (महाराष्ट्र) निवड करण्यात आली आहे. यावेळी पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश रामराव कचकलवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की गोरगरीब शेतकरी कष्टकरी शोषित पीडितांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तसेच पत्रकारांच्या पाठीमागे खंबीर उभे राहण्यासाठी ही संघटना संपूर्ण राज्यात काम करीत आहे असेच कामे नवनिर्वाचित महाराष्ट्र महिला प्रदेश उपाध्यक्ष सौ जयश्री घोडके यांनी संघटनेच्या माध्यमातून करावीत पुढील कार्यास शुभेच्छा देऊन ती पत्र देण्यात आले आहे



सौ जयश्री घोडके यांची निवड झाल्याची कळताच त्यांच्या मित्र परिवाराकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

पूर्णा येथे ,महाराष्ट्राची लोकधारा,, या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

दै,जनप्रभात
अरविंद कांबळे परभणी.

पूर्णा,:- येथील सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने शनिवारी (ता. १७) जूना मोंढा मैदानावर सायंकाळी सहा वाजता ''महाराष्ट्राची लोकधारा'' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री खंडेराय कला मंडलम् , छत्रपती संभाजी महाराज नगर , प्रस्तुत व प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय नृत्य कलावंत दिलीप खंडेराय दिग्दर्शित ''महाराष्ट्राची लोकधारा'' या पारंपारीक मराठ मोळा लोकनृत्य व लोककलेचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी जूना मोंढा मैदानावर भव्य रंगमंच उभारण्यात आला आहे. तालुक्यातील जनतेला सहकुटुंब हा कार्यक्रम पहाता यावा यासाठी महिलांची स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या मराठमोळ्या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



बनोटी तांडा संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी

दै.जनप्रभात वरठाण ता १६ प्रतिनिधी.

,सोयगाव तालुक्यातील बनोटी तांडा येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी संत सेवालाल महाराज यांची प्रतिमाचे पुजन करून प्रतिमा ट्रक्टर वर ठेवून ढोल ताशाच्या गजरात मोठ्या उत्साहात गावभर मिरवणूक काढण्यात आली नंतर महाप्रसाद लाभ ग्रामस्थांनी घेतला यावेळी मलखाण चव्हाण,शरद राठोड ,एकनाथ जाधव संदीप चव्हाण,अर्जुन जाधव ,रमेश चव्हाण ,रतीलाल जाधव दिनेश राठोड ,ज्ञानेश्वर जाधव ,अक्षय राठोड याच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते



घेतलेले कर्ज न भरल्याने सहा महिन्यांचा कारावास बनोटी येथील गणेश बिगर शेतकरी पतसंस्था प्रकरण

दै.जनप्रभात
वरठाण/ प्रतिनिधी.

,गणेश बिगर शेतकरी पतसंस्थेचे थकबिलेले कर्ज नांदगाव (ता.सोयगांव) येथील कर्जदाराच चांगलेच महागात पडले. सोयगाव न्यायालयात दाखल याचीकेत कर्जदारास कर्ज रक्कम व्याजासह भरण्यासह सहा महिन्याचा कारावास, श्री गणेश ग्रामीण बिगर शेती पतसंस्था बनोटी (ता. सोयगांव) येथील पतसंस्थेकडुन नांदगाव येथील बद्रिनाथ महारु राठोड यांनी ३५००० हजार रुपये कर्ज घेतले होते. कर्जाची परतफेड न केल्याने श्री. गणेश ग्रामीण बिगए सहकारी पतसंस्था मर्या बनोटी यांच्या मार्फत सिताराम भावडू खैरनार यांनी आरोपी बद्रीनाथ महारु राठोड , रा. नादगांव तांडा, ता. सोयगाव, जिल्हा संभाजीनगर येथील इसमाविरुद्ध मा. प्रथमवर्ग न्यायदंगधिकारी सोयगांव यांच्या न्यायालयात १३८ छ. ख अलीं प्रमाणे आरोपी बद्रीनाथ राठोड यांनी घेतलेले रुपये ३५०००/- कर्जाची परतफेड केली नाही म्हणून गुन्हा दाखल केला.रोजी. मा प्रथमवर्ग न्यायाधिश आर एन पाठक यांनी आरोपीस या प्रकरणी दोषी ठरवून सहा महिने कारावास आणि रुपये ७२,४९५/- भरपाई म्हणून फिर्यादीस देण्याचे आदेश. भरपाई न दिल्यास पुन्हा महिन्याची साधा कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. या प्रकरणी ॲड राजेश गिरी, सदर प्रकरणात आर सुरळकर,आर.एस आगे ,ॲड. सचिन सुनिल गिरी,एन.आर सुरळकर यानी कामकाज पाहिले.

****

शिरूर तालुक्यातील गावांमध्ये आता मुलांच्या हितासाठी मुलांच्याही होतात बैठका.

दै.जनप्रभात
शकीत मनियार / शिरूर : कैलास सत्यार्थी चिल्ड्रन फाउंडेशन यांच्या माध्यमातून शिरूर तालुक्यातील चाळीस गावांमध्ये मुलांचे हक्क व अधिकार यावर काय चालते. गावामध्ये महिला,ज्येष्ठ, तरुण, प्रौढ लोकांच्या विविध विषयासंदर्भात बैठकांचे आयोजन केले जाते, परंतु मुलांच्या बाबत त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी तसेच त्यांच्या समस्या, त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी मुल सहसा एकत्र येत नाहीत. मुल केवळ खेळा साठीच एकत्र येतात म्हणून संस्थेच्या माध्यमातून 'बाल चौपाल' नावाचा उपक्रम चाळीस गावांमध्ये सुरू आहे. या माध्यमातून मुलांची बैठक आयोजित करून, मुलांचे हक्क आणि अधिकार यावर मुलांना मार्गदर्शन केले जाते. बालविवाह, बालमजुरी, शाळाबाह्य मुले यांना शाळेच्या प्रवाहात आणून सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचा प्रयत्न संस्थेच्या माध्यमातून केला जातो. असाच उपक्रम आंधळगाव व कुरुळी येथे संस्थेचे कार्यकर्ते पद्मश्री दीक्षित,अनिल कांबळे तसेच स्वयंसेवक श्रीकांत पाटोळे, संजय पाटोळे ,योगेश सरोदे, सचिन पाटोळे, शारदा डबळे यांच्या माध्यमातून राबवण्यात आला. या उपक्रमात मुलांनी सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या हक्कबल व अधिकारांविषयी चर्चा केली. यामध्ये तयार करण्यात आलेल्या गटामध्ये मुलांनी आपल्या हक्क व अधिकारांविषयी माहिती चित्रांच्या आधारे रेखाटली.कार्यक्रमानंतर सर्व मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.



रिक्षा सेना चालक मालक संघटना राजापूर,रिक्षा चालक मालक सौभाग्यवती संघटना

राजापूरचा वतीने सोलो लावणी नृत्य स्पर्धेत इचलकरंजी येथील अनुष्का हिने पटकावले विजेतेपद

दै,जनप्रभात
राजापूर ता.प्रतिनिधी/प्रशांत पोवार


राजापूर, ता. १६ : रिक्षा सेना चालक-मालक संघटना, राजापूर, रिक्षा चालक-मालक सौभाग्यवती संघटना राजापूरच्यावतीने आयोजित सोलो लावणी नृत्य स्पर्धेमध्ये बहारदार लावणीनृत्य करणार्या इचलकरंजी येथील अनुष्का भंडारी हिने विजेतेपद पटकाविले. तर, सातारा येथील सृष्टी जाधव आणि कणकवली येथील पूर्वा मिस्त्री यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक तर, महाड येथील मनाली निवेलकर हिने उत्तेजनार्थ पारीतोषिक पटकाविले. शहरातील जवाहरचौकामध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम आणि आकर्षक चषक देवून गौरविण्यात आले.रिक्षा सेना चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष संजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला खासदार विनायक राऊत, आमदार राजन साळवी, राजापूर तालुका व्यापारी संघाचे अध्यक्ष संदीप मालपेकर, माजी नगराध्यक्ष ॲड. जमीर खलिफे, रिक्षा संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष अविनाश कदम, सुभाष गुरव, संतोष हातणकर, शिवसेनेचे माजी गटनेते विनय गुरव, समीर शिंदे, सुशांत मराठे, प्रदीप चव्हाण, बबली दुधवडकर, माजी नगरसेवक जितेंद्र मालपेकर, स्पर्धा परिक्षक प्रा. माळवी, वर्षा गोवळकर यांच्यासह रिक्षा चालक मालक संघटना, सौभाग्यवती महिला संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि रिक्षा व्यवसायिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते. रिक्षा सेना चालक-मालक संघटना, राजापूर, रिक्षा चालक-मालक सौभाग्यवती संघटना राजापूरच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्री सत्यनारायण महापूजचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने सोलो लावणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये कुडाळ येथील मृणाल सावंत, सावंतवाडी येथील नेहा जाधव, राजापूरातील पल्लवी अमरे, कणकवली येथील पूर्वा मिस्त्री, राजापूरातील अन्वेषा कांबळे, कविता राठोड, कराडमधील अनिल झेंड, इचलकरंजीतील अनुष्का भंडारी, पालयेतील वेदा पारकर, सातारातील सृष्टी जाधव, महाडमधील मनाली नवलकर, बीडमधील किरण मडके, राजापूरातील नेत्रा आंबेकर, देवगडमधील रमाकांत जाधव यांसह राज्यभरातील मोठ्यासंख्येने कलाकार सहभागी झाले होते. या सार्यांनी बहारदार लावणीनृत्य करीत प्रेक्षकांची मने जिंकली. तत्पूर्वी, सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल विविध संस्थांचे पुरस्कार विजेते व्यापारी संघाचे अध्यक्ष संदीप मालपेकर, नायब तहसिलदार दिपाली पंडीत, शिक्षक विलास जाधव, मुख्याधिकारी प्रशांत भोसले यांच्यासह प्रामाणिक रिक्षा व्यवसायिक म्हणून हसन ठाकूर, याकूब कुडाळकर, जुनेद गडकर, प्रेमप्रकाश कारेकर यांचा संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. तर, राजापूर अर्बन बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष अनामिका जाधव, उपाध्यक्ष विवेक गादीकर, अर्बन बँकेचे संचालक प्रकाश कातकर यांचाही सत्कार करण्यात आला. लकी ड्रॉ विजेती प्रेरणा चिंबुलकर यांनाही गौरविण्यात आले. विजय अमरे आणि सहकार्यांनी अयोध्या मंदीराच्या प्रतिकृतीमध्ये बांधलेल्या श्री सत्यनारायण महापूजेचे सार्यांकडून कौतुक केले जात होते. या पूजेला बसण्याचा मान साई दुधवडकर दाम्पत्याला मिळाला. शहरातील समर्थ महिला भजन मंडळाचा भजनाचा कार्यक्रमही पार पडला. या महापूजेचे औचित्य साधून झालेल्या हळदीकुंकू समारंभाचा मोठ्यासंख्येने महिलांनी लाभ घेतला. राजापूर तालुक्यासह सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रिक्षा संघटनांच्या पदाधिकार्यांनी दिवसभरातील कार्यक्रमांना उपस्थित राहून लाभ घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी रिक्षा सेना चालक-मालक संघटना, राजापूर, रिक्षा चालक-मालक सौभाग्यवती संघटना राजापूरचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, रिक्षा व्यवसायिक यांनी मेहनत घेतली.



अवतार मेहेरबाबा यांचा जन्मोत्सव सोहळा २४ व २५ फेब्रुवारीला तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपुर

दै,जनप्रभात

समुद्रपूर :- येथिल स्थानिक अवतार जन्मोत्सव आध्यात्मिक चेरिटेबल ट्रस्ट समुद्रपूरच्या वतीने अवतार मेहेरबाबा यांचा १३० वा जन्मोत्सव कार्यक्रम शनिवार २४ ते रविवार २५ ला विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी सायंकाळी ७ वाजता मा . सुधीरराव खडसे लोकमत (पत्रकार) याचे हस्ते मंगल कलश, द्विप प्रज्वलन व श्री डॉ प्रा . उमेशजी तुळस्कर विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय समुद्रपूर यांचे हस्ते सप्तरंगी झंडयाचे ध्वजारोहण होईल. त्यानंतर प्रार्थना आणि आरती होईल. रविवार ला सकाळी ४.३० वाजता मेहेर नाम जप, प्रातः ५ वाजता अवतार मेहेरबाबा यांचा जन्म, मेहेरबाबा यांची त्रिवार घोषणा, पाळणा, भजन आणि आरती होईल. सकाळी ७ वाजता अवतार मेहेरबाबा यांचे प्रतिमेसह समुद्रपूर येथील प्रमुख मार्गाने पद यात्रा जाईल व सकाळी ९ वाजता यात्रेचा समारोप अवतार मेहेरबाबा मंदिर येथे होईल. त्याचा प्रमाणे सकाळी १० वाजेपासून तर दुपारी १ वाजे पर्यंत मधुमेह, उच्च रक्तदाब, रक्त तपासणी, इ.सि. जि व व इतर तपासणी यांचे आरोग्य शिबिर घेण्यात येईल. दुपारी ४ ते ५ वाजेपर्यंत स्थानिक मेहेरबाबा महिला मंडळ यांचे गीत गायन होईल. रात्री ७ वाजता आरती आणि



प्रार्थना होईल. त्यानंतर ७. ते ९ वाजेपर्यंत समुद्रपूर येथिल बाबा प्रेमी स्वर सपना संगीतमय मेहेरगीत गायन यांचा मेहेर गीत गायनाचा कार्यक्रम होईल. ५ वाजेपासून ९ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व बाबा प्रेमिनी कार्यक्रमात सहभाग घेऊन अवतार मेहेरबाबा जन्मोत्सव कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन अवतार मेहेरबाबा आध्यात्मिक चेरिटेबल ट्रस्ट च्या वतीने करण्यात आले आहे.

धोडगांव वळणावर दुचाकी अनियंत्रित होऊन लोखंडी रॅलिंगवर जाऊन धडकली: : दुचाकीस्वार एक गंभीर एक किरकोळ जखमी

दै,जनप्रभात

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपुर समुद्रपुर:- तालुक्यातील हिंगणघाट उमरेड मार्गावरील धोडगांव वळणावर गिरडकडे येत असलेली दुचाकी अनियंत्रित होऊन लोखंडी रॅलिंगवर जाऊन धडकली या अपघात एक दुचाकीस्वार गंभीर तर एक किरकोळ जखमी झाला. प्राप्त माहितीनुसार १६ फेब्रुवारीला २ वाजताच्या सुमारास वर्धा वरुन गिरडकडे येत असलेली दुचाकी क्रमांक एम एच ३१ एच १६५९ अनियंत्रित होऊन वळणावरील लोखंडी रॅलिंगवर जाऊन धडकली या अपघात दुचाकीस्वार तेजस तुलसीदास साबळे वय २१ वर्ष रा वर्धा गंभीर जखमी झाला तर चंद्रकांत मनोज मेश्राम वय १९ वर्ष रा वर्धा हा किरकोळ जखमी झाला.घटनेची माहिती मिळताच ठाणेदार संदिप गाडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस कर्मचारी कृष्णा हुरर्ल यांनी घटनास्थळी जाऊन दोन्ही जखमींना उपचारासाठी गिरड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र रवाना केले.यावेळी दोन्ही जखमींवर उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी सेवाग्राम रुग्णालयात हलविण्यात आले.पोलिस कर्मचारी पंचम कोडगिलवार,शंकर नैताम यांनी रुग्णालयात जाऊन पंचनामा केला या संबंधी गिरड पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असुन पुढील तपास पोलीस करीत आहे.



ती भंगार एसटी विद्यार्थ्यांना घेऊन जाण्यासाठी कुणाच्या आदेशानुसार सुटली:- संतप्त पालकांचा एसटी आगाराला प्रश्न

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे
समुद्रपुर

समुद्रपुर:- शासनाच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी अनेक उपाययोजना करण्यात येते. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी एसटी बसच्या पास मध्ये सुध्दा सवल दिली जाते. मात्र एसटी महामंडळाच्या वतीने आजही ग्रामीण व शहरी असा दुजाभाव केला जात असल्याचा प्रकार तालुक्यातील तावी हिंगणघाट बस क्रमांक एम एच ४० एन ८६ २१ हिच्या सोमवारी १० वाजता आलेल्या बस वरुन दिसून आला हि बस मधामधून तुटून तर आहेच परंतु हिच्या खिडक्या पुर्ण फुटलेल्या अवस्थेत होत्या. आधीच गिरड तावी रसत्यावर मोठ मोठ्या खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. अशातच भंगार अवस्थेत असलेली बस पाठवून एसटी आगार विद्यार्थी व नागरिकांच्या जीवनाशी खेळत तर नाही ना असा प्रश्न या भंगार बसच्या निमित्ताने उपस्थित



झाला आहे. हिंगणघाट तावी या बसने मोहगांव, तावी, आर्वी, फरीदपुर या गावातील जवळपास ५० विद्यार्थ्यांनी प्रवासाचे कोणतीही साधन उपलब्ध नसल्याने या बसने गिरड, समुद्रपुर येथिल शाळेमध्ये शिक्षणासाठी तर या सर्व गावातील अनेक नागरिक ग्रामीण भागाची जीवन वाहिनी समजल्या जाणाऱ्या लालपरीने प्रवास करीत आहे. आधीच हवामान खात्याने वर्धा जिल्ह्यात ॲलो अलर्ट जारी केला असताना केव्हा वादळी वाऱ्यासह पाऊस व गारपिट येईल याचा नेम नसतांना अशी बस पाठवून एसटी आगार विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ खेळत असल्याच्या भावना विद्यार्थी व पालकांनी व्यक्त केल्या आहेत. यामुळे अशा खड्डेमय रस्त्याने चांगल्या अवस्थेच्या बस पाठवाव्यात अशी मागणी विद्यार्थी व पालकांनी केली आहे. तर हि अशी भंगार बस कुणाच्या आदेशानुसार सुटतात असाही प्रश्न विद्यार्थींच्या पालकांनी उपस्थित केला आहे. प्रतिक्रिया:- आधीच गिरड तावी या रस्त्याची अत्यंत दैनीय अवस्था झाली असून या रस्त्यावर मोठ मोठे जीवघेणे खड्डे पडले आहेत. अशातच सोमवारी १० वाजता हिंगणघाट तावी बस क्रमांक एम एच ४० एन ८६ २१ हि अत्यंत खराब अवस्थेत असलेली बस आल्याची माहिती मला कळताच मी स्वता जाऊन शाहनीशा केली असता हि बस मधामधून तुटून तर बसच्या खिडकी पुर्ण फुटलेल्या अवस्थेत आढळून आल्या आधीच रस्ता खराब आणि यातच अशा भंगार बसने याठिकाणी प्रवास करणाऱ्या विद्यार्थी व नागरिकांइकच्या जीवाशी हा खेळच आहे. अशा ग्रामीण भागात बस पाठवितांना आगार व्यवस्थापक याकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे. सरपंच विलास नवघरे मोहगांव

मातृदेव भव पितृदेवो भव कार्यक्रम नूतन कन्या विद्यालय येथे संपन्न

तळेगाव शामजी पंत

आज दिनांक १३/ २/ २०४ ला नूतन कन्या विद्यालय तळेगाव शामजी पंत येथे मातृदेवो भव पितृ देवो भव पूजन कार्यक्रम बाल संस्कार सेवा समितीमार्फत घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पाटील मॅडम तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्री. संजय भाऊ भुजाडे सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या पूजनाने झाली. उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. बाल संस्कार सेवा समितीच्या आदरणीय कार्यकर्ता राधा चौधरी यांनी अतिशय सुंदर रित्या कार्यक्रमात भावनिक स्नेह निर्माण केला. अनेक मुली व पालक सर्वांचे डोळे पाणावले होते. अर्चना भुयार, सारिका भुयार, सारिका पालांडे, नंदा झाकणे, विजया सुने, सुषमा मालपुरे, सर्वांनी मातृ-पितृ देवो भव हा संस्कार अतिशय उत्तमप्रकारे मनावर बिंबवीला. या कार्यक्रमात माता पालकांनी तसेच



वडील पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी लाभलेले प्रमुख पाहुणे श्री संजय भाऊ भुजाडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. तसेच शाळेतील शिक्षक श्री. राठोड सर, कुमारी मोरे मॅडम, कुमारी अजमेरे मॅडम यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पाटील मॅडम यांनी सुद्धा मातृ पितृ देवो भव हा संस्कार प्रत्येक मुलांच्या मनावर व्हायला पाहिजे असे मत व्यक्त केले. शाळेतील सर्व शिक्षक वृंद कार्यक्रमाला उपस्थित होते.

नवनियुक्त ठाणेदार झख मनोज गभने साहेब यांचे आखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघा डरे स्वागत

दै,जनप्रभात
तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपुर

समुद्रपुर:-- पोलीस स्टेशन हिंगणघाट येथे नुकत्याच नव्याने रुजू झालेले नवनियुक्त ठाणेदार मनोज गभने यांचे अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघा डरे हिंगणघाट पोलीस स्टेशन येथे भाऊराव कोटकर, हर्षाली सातघरे, सचिन महाजन, प्रवीण बरभे, राजा भैय्या ऊर्फ फैमोद्दीन, चंद्रशेखर शेडमाके यांनी ठाणेदार मनोज गभने यांची सदिच्छा भेट घेऊन पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थित पत्रकारांनी हिंगणघाट शहरात व वडनेर परिसरात वाढत्या गुन्हेगारी बाबत माहीती दिली. हिंगणघाट,वडनेर, बर्धा नंदोरी,सातेफळ रोडनी प्रवास करण्यार्यांनी बिना हेल्मेट व गाडीचे कागदपत्र व चालत्या गाडीवर मोबाईल फोनवर बोलतानी प्रवास करून नये. व नियमांचे पालन करावे. यावर ठानेदार गभणे यांनी मार्गदर्शन केले. हिंगणघाट परिसरातील समस्ये बाबत चर्चा करण्यात आली. पत्रकारांना आवश्यक



ती माहिती व सहकार्य देण्याचे नवनियुक्त ठाणेदार गभणे साहेबांनी आश्वासन दिले. या प्रसंगी ठाणेदार यांनी, पत्रकारांनी उत्कृष्ट आपली कामगिरी करावी. व पत्रकार हा चौथा स्तंभ असून पत्रकार हा निर्भीड असावा त्यांनी आपल्या लेखणीतून चांगले चांगले कामे करावी. असे मार्गदर्शन केले. व पत्रकारांसी संवाद साधला.भाऊराव कोटकर, हर्षाली सातघरे, सचिन महाजन ,प्रवीण बरभे, राजा भैय्या ऊर्फ फैमोद्दीन, चंद्रशेखर शेडमाके यांनी नवनियुक्त ठाणेदार गभणे साहेबांचे पुष्प गुच्छ देवुन उपस्थित सर्व पत्रकारांनी पुढील कामा बद्दल शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थिनींनी शाळेत फुलविले परसबागेचे नंदनवनीं पोषण आहाराचा दिला संदेश : मगन संग्रहालयाचे मार्गदर्शन

दै,जनप्रभात
तालुका प्रतिनिधी अमोल झाडे
समुद्रपुर :- सर्वत्र पोषण आहाराविषयी बोलल्या जातं मात्र कृतीतून नैसर्गिक परसबाग उभ्या होतांना दिसत नाही. मात्र गिरडच्या कन्या शाळेतील विद्यार्थिनींनी श्रमदानातून शाळा परिसरात विषमुक्त परसबागेचे नंदनवन फुलविले आहे. शिक्षिकांच्या मार्गदर्शनात विद्यार्थिनींनी उभारलेली परसबाग इतरांना प्रेरणादायी आहे. परसबाग निर्मितीसाठी गिरड येथील मगन संग्रहालय समितीच्या नैसर्गिक शेती विकास केंद्रातर्गत पोषक आहार विषयी चळवळ चालविली जातं आहे.गिरड परिसरातील ११ गावातील शाळेत पळसबाग उभारल्या आहे.तर बियाणे आणि रोप पूरविल्या गेली आहे. शाळेत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पोषक आहारात शाळेच्या परसबागेतून निर्माण केलेला विषमुक्त भाजीपाला वापरल्या जातो. यामुळे विद्यार्थिनींत देखील आहाराविषयी जागृती होत आहे. शाळेतील शिक्षिकांनी शालेय सुट्टीच्या वेळात परिसर स्वच्छतेसोबत पर्यावरण शिक्षण आणि गणिती परिभाषेत अभ्यासाक्रम विद्यार्थिनींत रुजविण्यासाठी परसबागेची निर्मिती



केली आहे.गिरड येथील जिल्हा परिषद उच्च केंद्र कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका माया चाफले यांच्या संकल्पनेतून परसबाग निर्मिती करतांना षटकोण, चौरस, गोलाकार, त्रिकोण, वर्तुकार आकृत्याच्या आकाराचे बाफे तयार करून भाजीपाला लागवड केली आहे. यातून सेंद्रिय शेतीचा संदेश दिला जातं आहे.या शाळेतील शिक्षक दिलीप महाजन,शिक्षिका भारती डखरे, मनीषा जांभुळे, माया सबाई, सीमा शेख यांनी पुढाकार घेतला आहे. या कन्या शाळेत एकूण विद्यार्थिनींची १५५ पट संख्या आहे. या शाळेत इयत्ता १ ते ७ वर्ग आहे. प्रत्येक दिवशी परसबागेची देखभाल करण्याची जबाबदारी क्रमवार वर्गाला दिली आहे. परसबागेतून उत्पादीत होणारा भाजीपाला समिश्र आहारात वापरला जातो. तर विद्यार्थिनी मोठ्या आवडीने परसबागेत कामे सांभाळतात. अनेक विद्यार्थिनींनी शाळेतील परसबागेची प्रेरणा घेत स्वतः च्या घरी परसबागा उभारलेल्या आहे. यामुळे आईवडिलांकडून देखील विद्यार्थिनींचे कौतुक केल्या जातं आहे. मगन संग्रहालय समिती या सामाजिक संस्थेच्या गिरड येथील नैसर्गिक शेती विकास केंद्राच्या वतीने वर्तीने फरीदपूर गावात घर तिथे परसबाग उपक्रमात राबविला जातं आहे. तर गिरड परिसरातील ११ गावातील शाळेत मार्गदर्शन करीत विद्यार्थ्यांच्या मदतीने परसबाग निर्मिती करून देशी बियाण्यासह कोबी, टमाटर, बांगी, पालक, मेथी, कांदा, लसूण, हळद, इत्यादी पालेभाज्यांचे रोप पूरविली आहे. यातून गावागावात पोषण आहाराविषयी जागृती केली जातं असल्याची माहिती प्रकल्प समन्वयक गजानन गारघाटे यांनी दिली आहे घर तिथे परसबाग ही संकल्पना रुजविण्यासाठी मगन संग्रहालयाचे विष्णू ब्राम्हणवाडे, नेत्रा

पाच दिवसीय रोटरी उत्सव २०२४ ची सांगता रंगारंग कार्यक्रमांनी

दै,जनप्रभात
प्रतिनिधि - अब्दुल कदीर बख्श

हिंगणघाट - रोटरी क्लब हिंगणघाट आयोजित ऋषचअ व्हाईट गोल्ड डरा प्रायोजित रोटरी उत्सव २०२४ ५ दिवसांच्या रंगारंग कार्यक्रमांनी संपन्न झाला. पाच दिवसीय रोटरी उत्सवाचे उद्घाटन ८ फेब्रुवारी रोजी रोटरी प्रांत ३०३० चे गव्हर्नर-निर्वाचित डॉ. राजेंद्र खुराना यांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्या दिवशी शालेय विद्यार्थ्यांचे नृत्यनाट्य सादर करण्यात आले. पहिल्या दिवशी हिंगणघाट व परिसरातील ग्रामीण शाळांमधील मुलांना मोफत प्रवेश तिकिटांचे वाटपही करण्यात आले, ज्याचा सर्व विद्यार्थ्यांनी महोत्सवात येऊन आनंद लुटला. या दिवसाचे सूत्रसंचालन प्राध्यापक माया मिहाणी व प्राध्यापक अशोक बोंगीरवार यांनी केले. दुसऱ्या दिवशीही शालेय विद्यार्थ्यांच्या नृत्यनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. या दिवशी माजी आमदार अशोक भाऊ शिंदे व राजूभाऊ तिमांडे व इतर पाहुण्यांनी महोत्सवात येऊन भेटवस्तू देवून महोत्सवाच्या भव्य आयोजनाचे कौतुक केले. या दिवशी कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक केदार सर व मंजुषा मुळे यांनी केले. तिसऱ्या दिवशी रोटरॅक्ट क्लबतर्फे लहान मुलांसाठी फॅशन शोचे



आयोजन करण्यात आले असून त्यात शहरातील अनेक मुलांनी सहभाग घेतला होता. त्यानंतर म्युझिकल हौसी गेमचे आयोजन करण्यात आले ज्याचे प्रोजेक्ट डायरेक्टर प्रशांत मोहता, अशोक डालिया, रितेश चुलानी, निकुंज मुंढा होते ज्यांनी संपूर्ण कॅम्पसला संगीतमय केले आणि अनेकांनी या खेळाचा आनंद घेतला. ११ फेब्रुवारी रोजी सकाळी महोत्सवाच्या प्रांगणात शालेय मुलांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली यामध्ये विविध शाळांमधील सुमारे ५०० मुलांनी सहभाग घेतला. यामध्ये इयत्ता पहिली ते पाचवी आणि इयत्ता सहावी ते नववी असे दोन गट तयार करण्यात आले. दोन्ही गटात प्रथम, द्वितीय, तृतीय* आणि प्रोत्साहनपर अशी चार बक्षिसे देण्यात आली. सर्व मुलांना चौथ्या दिवशी मोफत प्रवेश तिकिटेही देण्यात आली. यावेळी सायंकाळी चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले.याप्रसंगी रोटरी क्लब वर्धाचे अध्यक्ष व सदस्यांनी प्रास्ताविक केले. पाचव्या दिवसाच्या समारोप समारंभात एसडीएम शिल्पा सोनोने, पोलीस निरीक्षक मनोज गभणे, डॉ.अशोक मुखी, रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे सहसचिव अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच महोत्सवाचे अध्यक्ष सीए जितेंद्र वर्मा, क्लबचे अध्यक्ष प्राध्यापक राजू निखाडे, महोत्सव सचिव सुभाषजी कटारिया, महोत्सवाचे उपाध्यक्ष शाकीर खान पठाण आणि क्लबचे सचिव पितांबर चांदणी आणि केदार जोगळेकर उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमात महोत्सवाचे अध्यक्ष जितेंद्र वर्मा यांनी पाच दिवस चालणाऱ्या महोत्सवाचे वर्णन केले व येणाऱ्या अडचणींवर मात करून महोत्सव कसा यशस्वी करावा हे सांगितले.डॉ.अशोक मुखी यांनी रोटरी महोत्सवाची परंपरा केव्हा व कोठून सुरू झाली याची संपूर्ण माहिती दिली व सांगितले. की दरवर्षी रोटरी महोत्सव होईल. पीआय मनोज गभणे यांनी रोटरीच्या कार्याचे कौतुक केले तसेच रोटरी फाऊंडेशनला देणगी देणाऱ्यांचे कौतुक केले व रोटरी सदस्यांचे अभिनंदन केले.एसडीएम शिल्पा जी सोनोने यांनीही रोटरी उत्सव संस्थेचे कौतुक केले व या भव्य कार्यक्रमात जे सहकार्य लागेल ते सदैव देऊ असे आश्वासन दिले. रोटरीला शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे संचालन मुरली लाहोटी यांनी केले तर आभार सुभाषजी कटारिया यांनी मानले.

पाच दिवसीय रोटरी उत्सव यशस्वी करण्यासाठी रोटरीचे सुरेश चौधरी, संजय बोथरा, अशोक चंदनखेडे, संजय शेंडे, शशांक खांद्रे, संदीप मुंढे, मुकुंद मुंढा, मितेश जोशी, उदय शेंडे, नरेंद्र पोहनकर, सतीश डांगरे, निशा शर्मा, हिमानी त्रिपाठी यांनी परिश्रम घेतले. , प्रतिभा वांढरे, सारिका दाभाडे, प्रभाकर सत्यवणे, पंढरी भाऊ कापसे, अशोक मिहाणी, प्रणय डागा इत्यादी सर्व सदस्य आणि रोटॅक्ट क्लबच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

****

सेलूत ३५ वर्षानंतर प्रथमच शंकरपटाचा थरार.. बैलजोड्यांसाठी आकर्षक पावणेसहा लाखांचे पुरस्कार



दै,जनप्रभात

सेलू:- साहसिक जनशक्ती संघटनेसह मित्र परिवाराचे आयोजन आज पासून रंगणार शंकरपठाचा थरार सेलू प्रशांत झाडे शिवजयंतीच्या पर्वावर साहसिक जनशक्ती संघटना तथा मित्र परिवाराच्या संयुक्त विद्यमाने सेलू तालुक्यात भव्य शंकरपट आयोजित करण्यात आला आहे. याकरिता पावणेसहा लाख रुपयांच्या आकर्षक अशा पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून ३५ वर्षाच्या प्रदिर्घ कालखंडानंतर प्रथमचं सेलू शहरात होत असलेल्या शंकरपटाविषयी उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

साहसिक जनशक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र कोटंबकार नेहमीच आपल्या अनोख्या आणि अभूतपूर्व आयोजनासाठी ओळखल्या जातात. महिनाभराआधीच त्यांनी सेलूसह वर्धा शहरात भव्य असा रोजगार मेळावा आयोजित करीत जिल्ह्यातील दोन हजार बेरोजगारांच्या हाताला काम दिले. शिवजयंतीच्या पर्वावर यावेळी त्यांनी सेलू शहरात भव्य अशा शंकरपटाचं आयोजन केलं आहे. शनिवार ता.१७ फेब्रुवारी ते गुरुवार ता.२२ फेब्रुवारी रोजी रेहकी रस्त्यावर असलेल्या पेट्रोल पंपासमोरील लोहिया यांच्या शेतात ह्या शंकरपटाचा थरार रंगणार असून याकरिता पहिल्या पंधरा बैलजोड्यांना आकर्षक असे पावणेसहा लाखांचे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. शंकरपटात धावणाऱ्या बैलजोड्यांसाठी १३५० फुटांची दान उपलब्ध राहणार असून यात सहभागी होणाऱ्या बैलजोडीसह त्याच्या मालकाला शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

याप्रसंगी आयोजित उद्घाटन सोहळ्याला खासदार रामदासजी तडस, महाकाली शिक्षण संस्थेचे सचिव सचिन अग्निहोत्री, माजी आमदार प्रा सुरेश देशमुख, राजू तिमांडे, सहआयुक्त विवेक इलमे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय जयस्वाल, वर्धा जिल्हा हौशी कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष महेशसिंग ठाकूर, भारत राष्ट्र समितीचे पवन तीजारे, शशांक घोडमारे, बाजार समितीचे सभापती केशरीचंद खंगार, अमित गावंडे, सुधीर कोठारी, नगराध्यक्ष स्नेहल देवतारे, बाजार समितीच्या संचालक तथा कोटंबा येथील सरपंच रेणुका कोटंबकार, वरुण दफ्तरी, उपविभागीय अधिकारी दिपक करंडे, तहसीलदार स्वपनिल सोनवणे, पोलीस निरीक्षक तिरुपती राणे, सरपंच संघटनेचे जिल्हा अध्यक्ष प्रा धर्मेंद्र राऊत, सेवानिवृत्त तहसीलदार बी एन तीनघसे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

डॉ. आंबेडकर कॉलेजचे रासेयो शिबिर संपन्न.

दै,जनप्रभात

वर्धा (प्रतिनिधी)डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने समाजकार्य विचार शिबिर जामठा येथे दिनांक ५ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०२४ या दरम्यान घेण्यात आले. या शिबिरात रोज प्रभात केरी, योगाभ्यास योगशिक्षक दामोदरजी राऊत घेत होते. ग्रामविकास योजनांसाठी ग्रामीण सहभागीता मूल्यमापन (झठअ),सत्र विनोदकुमार खोबरागडे जिल्हा परिषद, वर्धा पाणी पुरवठा विभाग यांनी घेतले. अंधश्रद्धेविषयी जनजागृतीसाठी श्री पंकज वंजारे, विदर्भ संघटक अ.भा. अ.नि.स. यांनी जादूटोणा प्रतिबंध कायदा व वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर मार्गदर्शन गावकऱ्यांना व शिबिरार्थीना मार्गदर्शन केले. महिलांच्या आरोग्याविषयी सत्र घेतांना डॉ. प्रिती जोशी, प्रकल्प समन्वयक, स्त्री मुक्ती संघटना, वर्धा यांनी योग्य आहाराविषयी मार्गदर्शन केले. मतदान जनजागृती अभियानांतर्गत श्री. अतुल रासपायले नायब तहसीलदार, उपजिल्हा निवडणूक कार्यालय वर्धा यांनी शिबिरार्थीना व गावकऱ्यांना मतदानाचे महत्व पटवून दिले. कौटुंबिक स्वास्थाकारीता समुपदेशन याविषयावर श्रीमती करुणा महतारे, कौटुंबिक न्यायालय नागपूर यांनी महिलांना मार्गदर्शन केले. भ्रमणध्वनीच्या वापरातून वाढती गुन्हेगारी व प्रतिबंधात्मक उपाय या विषयावर श्रीमती रेश्मा रघाटाटे समन्वयक सखी वन स्टॉप सेंटर यांनी गावकऱ्यांना व शिबिरार्थीना मार्गदर्शन केले. समाजकार्य आणि व्यक्तिमत्व विकास विषयावर विविध बौद्धिक सत्र, मतदान, पोषण आहार, शेतकऱ्यांच्या समस्या इत्यादी ज्वलंत विषयावर सर्वेक्षण, सांस्कृतिक कार्यक्रमात विविध सामाजिक विषयावर समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम, श्रमदान, पाणी व्यवस्थापन, ग्रामीण स्वच्छता अभियान, सिकलसेल तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, रक्तदाब तपासणी असे विविध कार्यक्रम घेण्यात आले. ग्रामीण महिलांसाठी तीळगुळ कार्यक्रम, बटाटा शर्यत आणि उखाणे स्पर्धा ठेवण्यात आली होती. शिबिराचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते संदीपजी शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मिलिंद सवाई, सुभेदार रामजी आंबेडकर एन्युकेशन सोसायटीच्या संचालक डॉ. चेतना सवाई, सरपंच श्री. दीपकजी तपासे इबोनिथ ग्रुपचे श्रीमती विद्या पाल, श्री. दीपक तपासे श्री. संजय बाभुळकर, पोलीस पाटील श्री. प्रवीण देवढे, हिरामण वरघट ग्रामपंचायत सदस्य यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. उदघाटन सत्राचे प्रास्ताविक शिबिर प्रमुख प्रा. प्रशांत घुलक्षे यांनी केले. संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी



डॉ. दीपक मगरदे तर आभार शिबिर संयोजक डॉ. माधुरी झाडे यांनी केले.

समारोपीय कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. मिलिंद सवाई, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. दीपक मगरदे, शिबिर प्रमुख प्रा. प्रशांत घुलक्षे, शिबिर संयोजक डॉ. गणेश गाडेकर व डॉ. माधुरी झाडे, उपसरपंच श्रीमती मनिषा मानकर यांची उपस्थिती होती. समारोपीय सत्रात शिबिर अहवाल वाचन डॉ. माधुरी झाडे यांनी केले. शिबिर मूल्यांकन डॉ. दीपक मगरदे, शिबिराविषयी मनोगत धिरज खुरद व प्राची काकडे यांनी व्यक्त केले. स्पर्धेतील गावकरी महिला विजेत्यांना सन्मानचिन्ह व भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. संचालन डॉ. गणेश गाडेकर यांनी तर शिबिराचे आभार प्रा. प्रशांत घुलक्षे यांनी मानले. या शिबिरातील शिबिरार्थींनी गावातील लोकांची मने जिंकली. गावकऱ्यांनी या शिबिराला भरपुर सहकार्य केले. इंजापूर-जामठा गट ग्रामपंचायत सरपंच श्री दीपक तपासे यांनी पुढल्या वर्षी हे शिबिर इंझापूर व जामठा येथे पुन्हा आयोजित करावे अशी शिबिर आयोजन समितीला विनंती केली व तसा प्रस्ताव शिबिर आयोजन समितीला दिला. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी श्री कैलास बडे शिबिर आयोजन समिती, बि.एस. डब्लू. व एम.एस.डब्लू. च्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत दोन दिवसीय अनिवासी प्रशिक्षण कार्यशाळा

दै,जनप्रभात

कामठी:- दिनांक ८ फेब्रुवारी व ०९ फेब्रुवारी २०२४ स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत दोन दिवसीय अनिवासी प्रशिक्षण कार्यशाळा ग्रामपंचायत वडोदा येथील सभागृहात पार पडली. सदर प्रशिक्षण कार्यशाळेचे अध्यक्ष मा.श्री. राजुजी थोटे सरपंच ग्रामपंचायत वडोदा, तसेच प्रशिक्षणाला प्रशिक्षक म्हणून लाभलेले श्रीमती निता पोटफोडे, श्रीमती जया मेहर ,उअॅल छाया दातार , स्वाती करंभे, व पंकज उकुंडे ,प्रणील मंडपे, ग्राम विकास अधिकारी श्री. दिनकर इंगळे सर इत्यादी उपस्थीत होते. त्या प्रसंगी मा. आमदार श्री. टेकचंदजी सावरकर, उमेशजी रडके, श्री. अनिलजी निदान, रमेशजी चिकटे, इत्यादी मान्यवरांनी प्रशिक्षणाच्या दुसऱ्या उपस्थित राहून प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन केले व प्रमाणपत्र वितरीत केले. प्रशिक्षण कार्यशाळेला सरपंच, ग्रामसेवक, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती सदस्य ,महिला बचत गट प्रतिनिधी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर तसेच पदाधिकारी इत्यादी उपस्थित होते.



अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना रडवले... 'अवकाळी'ने डोळ्यांत आसवे... शेतशिवार स्तब्ध!





दै,जनप्रभात

गौरव सोमकुवर/कारंजा (घाडगे)

वर्धा :- गुरुवारी सायंकाळी शेतातील कामे उरकून शेतकरी, शेतमजूर घरच्या वाटेने निघाले होते तर काही घरी जाण्याच्या तयारीत होते. अचानक जोराचा वारा सुटला. आभाळ दाटून आले आणि कुणाच्या डोळ्यापुढे तर कुणाच्या डोळ्यामागे शेतात अवघ्या अर्धा ते पाऊण तासांत होत्याचे नव्हते झाले. काहींनी रात्रीच नुकसान पाहून डोळ्यांतील अश्रुंना वाट मोकळी केली तर सकाळी शेतशिवारातील चित्र पाहून शेतकर्यांसोबतच मजुरांचेही मन सुन्न झाले. शेतातील संत्राची झाडे उन्मळून पडलेलली... संत्राचा सडा जमिनीवर पडलेला... भरलेला गहू, काढणीला आलेला चणाही जमिनदोस्त...सार चित्र स्तब्ध करणार आहे. अवघ्या काही वेळात अवकाळी वरचंटा फिरला आणि शेकडो एकरातील शेतशिवार नुकसानीने हादरला. मागील चार ते पाच दिवसांपासून जिल्ह्यात अवकाळी पाऊस, गारपिट, वादळाने शेतीचे मोठे नुकसान होत आहे. गुरुवारी १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी कारंजा (घाडगे) तालुक्यात जोरदार वादळ, गारपिट आणि अवकाळी पाऊस बरसला. अवकाळी तडाख्याने संत्रा, गहू, चणा, भाजीपाला, चाराचर्गीय पिकांचे अतोनात नुकसान झाले. संत्राच्या फळांनी लदबदलेली काही शेतांतील झाडे उन्मळून जमिनीवर पडली. जवळपास प्रत्येकच बागेत संत्राचा मोठा सडा पडलेला होता. झाडांना लाचलेली वाळूत्रे कठडेही तुटून पडले. अनेक झाडांच्या फांद्या तुटल्या. संत्राच्या फळांचा सडा पडलेला पाहून शेतकर्यांच्या काळजात कालवाकालव होत होती. काढणीला आलेला चणा गारपिटीत गार झाला. चणा जमिनदोस्त होऊन मोठे नुकसान झाले. काढणीला आलेला आणि काढणीस येऊ लागलेला गहू जमिनदोस्त झाला. जमिनदोस्त झालेला गहू उभा होणार नसून भरण्याचीही शक्यता नाही, गव्हासोबतच चण्याचेही मोठे नुकसान झाले आहे. गारांचा मार लागल्याने संत्र्यालाही किमत मिळणार नाही. शेतकर्यांचे स्वप्नच अवकाळी पाऊस, गारपिट, वादळाने हिरावले. नुकसान पाहून शेतकर्यांच्या डोळ्यांत आसवांचा बांध दाटलेला आहे. - नुकसान झालेली गावे - आजनादेवी, नारा, गारपिट, येणगाव, पिपरी, भालेचाढी, जुनापाणी, शेलगाव, गवंडी, उमरी, सावळी, आगरगाव, ठाणेगाव, लिंगा, श्यामकुंड, पांजरा, चोपण, मेटहिरजी, वाघोंढा, सावरढोह, खेलगाव, सुसुंद्रा, मदनी, धावडी, बिहाडी पिपरी, बोटोणा, पारडी यासह इतरही गावांमध्ये नुकसान. - संत्रा विकणार होतो पण, अवकाळीने नुकसान केले -- संत्रा विकणारच होतो, पण, अवकाळी पाउस, गारपिट आणि वादळात संत्रा बागेचे नुकसान झाले. संत्राचा जमिनीवर सडा पडला. काही झाडे उन्मळून पडली. पिकाचा विमा काढलेला नाही. लाखो रुपयांचे नुकसान झाले. काय करावे सूचत नाही. सरकारने मदत करावी, असे नुकसानग्रस्त शेतकरी मेघराज खवशी म्हणाले. --- ६० टक्के संत्रा गळला --- माझ्याकडे थाराशे संत्रा झाडाची बाग आहे. यातील ६० टक्के संत्रा गळून पडला. यात सुमारे १० लाख रुपयांचे नुकसान झाले. जमिनीवर पडलेला संत्रा मजुरांद्वारे शेताबाहेर काढण्याचे काम सुरु आहे. खाली पडलेली संत्री बाहेर फेकून देण्याची वेळ आली आहे, असे शेतकरी अनिल भागवतकर यांनी सांगितले. --- गारीचा मार लागला, डोळ्यासमोर संत्रा गळाला --- गारपिट व पाऊस सुरु असताना शेतातच होतो. यावेळी वादळ आले आणि डोळ्यासमोरच संत्र्याची फळ खाली पडत असताना खिन्न होऊन पाहत होतो. माझ्या शेतातील संत्रा ,गहू पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यात जवळपास चार ते पाच लाखांचे नुकसान झाले आहे. गारीचा मार लागला आणि डोळ्यासमोरच संत्रा गळाला, असे शेतकरी बंडू वागरे यांनी सांगितले. --शेतात डोळ्यात पाणी येते, म्हणून बाहेर फिरतो --- काल रात्रीच शेतात पाहून आलो. ज्वारी, गहू जमिनदोस्त झाला आहे. संत्राचेही नुकसान झाले आहे. शेतात गेलो की चित्र पाहून डोळ्यात पाणी येऊन चक्कर येते. मन सुन्न झाले आहे. सरकार मदत देणार काय? भविष्याच्या चिंतेत जीव टांगणीला लागला आहे. सर्वांचेच नुकसान झाले आहे. शेतात गेल्यानंतर डोळ्यात पाणी येते म्हणून बाहेर फिरतो, असे एक शेतकरी कंठाशी आलेला हुंदका आवरत म्हणाला. -- शेतकर्यांना सरसकट मदत करावी - आमदार केचे - झालेले नुकसान फार भयंकर आहे. शेतकर्यांची काळजी वाढली आहे. संत्रा गळाला, गहू, चणा आदी पिकांचे नुकसान झाले आहे.

आज हिंगणघाट येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते भूमीपूजन

दै,जनप्रभात वर्धा,दि.१६ (जिमाका) : हिंगणघाट येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीचा उद्या दि.१७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता सर्वोच्च न्यायालय दिल्लीचे न्यायमूर्ती भूषण रा. गवई यांच्या हस्ते भूमीपूजन होणार आहे. यावेळी मुबंई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन वा. सांबरे हे प्रमुख पाहुणे म्हणुन असणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुबंई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मुकुलिका श्री. जबळकर राहणार आहे. तर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय जु. भारुका यांची प्रमुख उपस्थित असणार आहे.दिवाणी व फौजदारी न्यायालय हिंगणघाट येथे आयोजित जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या भूमीपूजन कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे. असे आवाहन हिंगणघाटच्या वकील संघाचे अध्यक्ष ॲड राजेश रा. बोंडे व जिल्हा न्यायाधिश -१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधिश हिंगणघाट विद्याधर काकतकर यांनी केले आहे.

रनाळा येथे राष्ट्र स्तरीय खासदार चषक कबड्डी सामना संपन्न...

कामठी :-नंदू कोल्हे

तालुक्यातील कळमना कामठी रोडवरील रनाळा गावात विठ्ठल रुक्मिणी मंदिरा जवळ पटांगणात रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार कृपाल तुमाने यांच्या आयोजनातून १२ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी पर्यंत भव्य महिला व पुरुष खुल्या गटातील खासदार चषक कबड्डी सामन्याचे आयोजन करण्यात आलेले होते या खासदार चषक कबड्डी सामन्याचे उद्घाटन खासदार कृपाल तुमाने यांच्या हस्ते करण्यात आले असून कार्यक्रमाला प्रामुख्याने मुख्य अतिथी खासदार डॉ श्रीकांत शिंदे आमदार टेकचंद सावरकर आमदार आशिष जयस्वाल माजी मंत्री परीनय फुके पुर्वेश सरनाईक(युवासेना कार्याध्यक्ष) खुल्या गटातील पुरुष स्पर्धेत संघ विजय झाला तर उपविजेता झाला तर तृतीय बक्षिसाच्या मानकरी ठरला तसेच महिला गटामध्ये विजेता उपविजेता व तृतीय बक्षिसाचे मानकरी ठरले तसेच वैयक्तिक बक्षिसामध्ये उत्कृष्ट चढाई स्पोर्ट सायकल उत्कृष्ट पकड स्मार्ट मोबाईल . मॅन ऑफ द सिरीज एलईडी टीव्ही पुरस्कृत करण्यात येणार आहे . कबड्डी स्पर्धेच्या प्रेक्षकांकरिता रोज लकी ड्रॉ डरे निवडक प्रेक्षकांना हात घडी वाटप करण्यात आले कबड्डी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाकरिता शिवसेना महाराष्ट्र प्रदेश सचिव शुभम नवले ग्रामपंचायत सरपंच पंकज साबळे शिवसेना जिल्हाप्रमुख संदीप इटे केल वार अमोल गुजर लोकसभा संघटक विनोद सातंगे



गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ आणि गोंदिया जिल्ह्यात २१ ते २५ फेब्रुवारी कालावधीत आदिवासी मेळाव्याचे आयोजन करावे - आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित

दै,जनप्रभात मुंबई, दि. १६ : आदिवासी समाज बांधवांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसंदर्भात लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ आणि गोंदिया जिल्ह्यात २१ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत आदिवासी मेळाव्याचे आयोजन करावे, अशा सूचना आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी दिल्या. मंत्रालयात मंत्री डॉ.गावित यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प कार्यालयातंर्गत लाभार्थी मेळाव्याच्या नियोजनाबाबत बैठक घेण्यात आली. त्यावेळी मंत्री डॉ. गावित बोलत होते.मंत्री डॉ.गावित म्हणाले की, केंद्र व राज्य शासनातर्फे आदिवासी समाजातील अनुसूचित जमाती वर्गातील लाभार्थ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. आदिवासी लाभार्थ्यांना न्युक्लिअस बजेट योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, शबरी घरकुल योजना या योजनांसह विविध योजनांसंदर्भात मार्गदर्शन तसेच पात्र लाभार्थ्यांना थेट लाभ याठिकाणी देण्यात येणार आहेत. २१ फेब्रुवारी रोजी गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा, देवरी येथे २२ फेब्रुवारी, गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी २३ फेब्रुवारी रोजी, चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर २४ फेब्रुवारी, यवतमाळ जिल्ह्यातील राजुरा, बरोरा, झरीजामनी आणि २५ फेब्रुवारी रोजी यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा, कळंब येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या मेळाव्यास जास्तीत जास्त आदिवासी समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन मंत्री डॉ.गावित यांनी केले आहे. या बैठकीस प्रकल्प अधिकारी गडचिरोली राहुल कुमार मीना, प्रकल्प अधिकारी भामरागड आदित्य जीवने, आदिवासी विकास विभागाचे उपसचिव मच्छिंद्र शेळके तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आरोग्या बाबत जागरूक असणे आवश्यक खासदार कृपाल तुमाने यांचे प्रतिपादन

आनंद नगरात निशुल्क आरोग्य शिबिराचे आयोजन

दै,जनप्रभात कामठी :-नंदू कोल्हे - आधुनिक जीवन शैली चा प्रभाव आरोग्या वर होत असून कोविड नंतर आकस्मिक मृत्यु चे प्रमाण वाढले आहे त्यामुळे प्रत्येकाने आरोग्या बाबत जागरूक असणे आवश्यक आहे असे प्रतिपादन खासदार कृपाल तुमाने यांनी केले नवी कामठीतील आनंद नगरात खासदार कृपाल तुमाने यांच्या वतीने शिवसेना वैद्यकीय कक्ष आणि शिवसेना नागपुर जिल्हा मार्फत आयोजित आरोग्य शिबिरात खा तुमाने बोलत होते, यावेळी भाजपा पदाधिकारी अनिल निधान, विक्की कोंबले,लालसिंग यादव,प्रतिक पठोळे, माजी नगरसेविका संध्या रायबोले,ग्रा प सदस्य राजश्री शिवले,नरेश मोहबे, जितेंद्र खोब्रागडे,शिवसेना पदाधिकारी शुभम नवले, राजन सिंग, राहुल शर्मा, रोहन बिल्लोरवान, श्यामली बागडे, माजी सरपंच ओमप्रकाश कुरील प्रामुख्याने उपस्थित होते. सकाळी शिबिराचे उदघाटन खासदार कृपाल तुमाने यांच्या हस्ते करण्यात आले शिबिरात एकूण १७४० रुग्णांची तपासणी करण्यात आली. ६३५ नागरिकांना निशुल्क चश्मे वितरण खासदार तुमाने यांच्या हस्ते करण्यात आले.शिबिरात नेत्ररोग,स्त्रीरोग,बालरोग,



अस्थिरोग, त्वचारोग ,हृदयरोग, श्वसनरोग, मेडिसिन,सर्जरी बाबत तपासनी करुन निष्णात डॉक्टर्स कडून औषधोपचार करण्यात आले . शस्त्रक्रिया ची गरज पडल्यास रुग्णा वर खासदार कृपाल तुमाने यांच्या माध्यमातून निशुल्क शस्त्रक्रिया करण्यात येतील तसेच शिबिरात सर्व प्रकारच्या कैंसर चे निदान व संदर्भ सेवा देण्यात आल्या. शिबिराच्या यशस्वीते साठी अरविंद चवडे, बादल कठाने, शंकर चवरे, निमिष मेश्राम, हर्ष धुर्वे, अभिषेक कनोजे,रोहित मेश्राम, बादल नारायने, अनिल बोरकर, देवानंद चवरे,अतुल यादव,सुरेंद्र गिरी,अमोल कातुरे,पूजा शाहू, सुनिता कटकवार, शशिकला मैंद, आफरोज परवीन, जोहरा शेख यांनी सहकार्य केले

आर्वी येथे महिला बचत गटांव्दारे उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन व मेळाव्याचे आयोजन

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान

दै,जनप्रभात वर्धा,दि.१६(जिमाका) : स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी दि.१६ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत आर्वी येथील साई कृपा मंगल कार्यालय येथे नवतेजस्विनी तालुकास्तरीय प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनी जास्तीत जासत नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी महिलांच्या सशक्तीकरणासाठी त्यांना संघटीत करणे, स्वावलंबी करणे, महिलांशी संबंधीत योजना राबवणा-या सर्व शासकीय यंत्रणाचे प्रतिनिधी एका छताखाली एकत्र येऊन विविध योजनांचे लाभ लाभार्थ्यांना देणे व त्या लाभार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करणे या उद्देशाने मुख्यमंत्री योजना सशक्तीकरण अभियान महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणुन स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी नवतेस्विनी तालुका स्तरीय प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनात धामणगाव, आष्टी व कारंजा तालुक्यातील ४० महिला बचत गटांचे स्टॉल लावण्यात आले आहे. प्रदर्शनी निमित्त विविध विषयावर आधारित चर्चा व मार्गदर्शन सत्र, संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिलांच्या उद्योग वाढीसाठी मार्गदर्शन सत्र, कौशल्य विकास, विविध महामंडळे, शासकीय योजनांची माहिती देणारे कार्यक्रम, बँक कर्जाबाबत माहिती, सकस आहार रेसिपी स्पर्धा, मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाबाबत माहिती इत्यादी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.प्रदर्शनात बचत गटाव्दारे उत्पादित मिश्र कडधान्ये, सर्व प्रकारचे मसाले, मोहाचे लाडू, हळद पावडर, मिरची पावडर, पापड, नैसर्गिक वनस्पती पासुन बनविलेले सांधेदुखी तेल, दुग्धजन्य पदार्थ, गाईच्या शेणापासून तयार झालेल्या धूप बत्ती, कुरुड्या, धापोडे, मुंग वडी, बांबुपासून बनविण्यात आलेल्या विविध आकर्षक वस्तू प्रदर्शनात विक्रीस उपलब्ध असणार आहे. त्यामुळे नागरिकांनी प्रदर्शनी भेट देऊन वस्तूंची खरेदी करावी, असे आवाहन वरीष्ठ जिल्हा समन्वयक अधिकारी यांनी केले आहे.

नवे संकेतस्थळ सांस्कृतिक कार्य विभागाला लोकाभिमुख करणारे ठरेल- मंत्री सुधीर मुनगंटीवार

दै,जनप्रभात

मुंबई, दि. १६ :राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे संकेतस्थळ विभागाच्या कार्यप्रणालीला लोकाभिमुख करणारे ठरेल. सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित सर्वांसाठी हे संकेतस्थळ उपयुक्त ठरणारे असून सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.मंत्रालयात मंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते सांस्कृतिक कार्य विभागाच्या https://cultual.mahaashta.gov.in/ या नव्या संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, उपसचिव नंदा राऊत, अवर सचिव बाळासाहेब सावंत व सुमंत पास्ते, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्गे, सांस्कृतिक कार्य संचालक विभिषण चवरे, दार्शनिका विभागाचे कार्यकारी संपादक आणि सचिव डॉ. दिलीप बलसेकर आदी यावेळी उपस्थिती होते.

या नव्याने तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळावर विभागातील विविध कार्यासने, क्षेत्रीय कार्यालये, महामंडळे आदींची माहिती देण्यात आली आहे. यावेळी अधिनस्त कार्यालये असलेल्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, सांस्कृतिक कार्य संचालनालय, पुराभिलेख संचालनालय, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, दर्शनिका विभाग, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य हिंदी-सिंधी- गुजराती साहित्य अकादमी, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव आणि कोल्हापूर चित्रनगरी यांची माहितीही देण्यात आली आहे.

याशिवाय, विभागांची एकत्रित माहिती. विभागाने घेतलेल्या विविध निर्णयांची माहिती, विविध कार्यक्रमांची छायाचित्रे आणि व्हिडिओच्या समावेशाने हे संकेतस्थळ वापरकर्त्यांना अतिशय उपयुक्त ठरणार आहे. सांस्कृतिक विभागाच्या विविध योजना, पुरस्कार, स्पर्धा व शिबिरे, महोत्सव, प्रशिक्षण कार्यक्रम आदींची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

येरखेडा येथे भाजपचे गाव चलो अभियान कामठी



दै,जनप्रभात

कामठी तालुका भारतीय जनता पार्टीचे वतीने येरखेडा येथे गाव चलो अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. नागपूर जिल्हा भाजप महामंत्री अनिल निधान यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराजाच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करुन अभियानाची सुरुवात करण्यात आली यावेळी जिल्हा भाजपचे किशोर बेले,कामठी तालुका भाजप अध्यक्ष उमेश रडके ,भाजप युवा मोर्चा अध्यक्ष किरण राऊत ,ओबीसी मोर्चा चे अध्यक्ष सचिन डांगे , राजकिरण बर्वे, रनाळा ग्रामपंचायतचे सरपंच पंकज साबळे, कामठी तालुका भाजप महामंत्री मंगला कारेमोरे ,माजी सरपंच मनीष कारेमोरे ,उपसरपंच मंदा महल्ले पाटील, प्रा डॉ पराग सपाटे , खसाल्याचे उपसरपंच अर्जुन बावनकुळे ,मनोज धानोरकर, अतुल ठाकरे, राजेंद्र चौरे, उमेश महाले ,येरखेडा भाजप अध्यक्ष गजानन तिरपुडे ,महिला आघाडी अध्यक्ष जया बाडीभस्मे,योगेश हलमारे, ग्रामपंचायत सदस्य अनिल भोयर ,नरेश मोहबे ,राजश्री धीवरे, कुलदीप पाटील, आचल तिरपुडे ,सुमेध दुपारे, प्रिया दुपारे, ज्योती घडले, अमोल घडले, राहुल शर्मा,सुषमा राकडे ,वदना भस्मे ,वनिता नाटकर, मुक्ता कारमोरे ,सरिता भोयर ,रेणुका गुजेवार, प्रीती देशमुख, सुषमा तलमले, उपस्थित होते गाव चलो अभियानात नागपूर जिल्हा भाजप महामंत्री अनिल यांच्या उपस्थितीत तेरखेडा येथील ज्येष्ठ नागरिक भास्कर वडपल्लीवार क्रीडा क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय खेळाडू अमित ठाकूर शेतकरी बाबा मल्ले पाटील यांचे घरी जाऊन त्यांच्याशी चर्चा करुन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षाच्या काळात केलेल्या विविध विकास कामाची माहिती दिली वार्ड क्रमांक सहा येथील देवी मंदिर सभागृहात भाजप बूथ कमिटी अध्यक्ष सचिव युवा वॉरियर्स यांच्या मेळावा घेण्यात आला मेळाव्यात प्रमुख अतिथींनी मार्गदर्शन केले व रात्रीला एडवोकेट आशिष वंजारी यांच्याकडे प्रमुख अतिथी मुक्कामी होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक एडवोकेट आशिष वंजारी यांनी केले संचालन गजानन तिरपुडे यांनी केले व आभार प्रदर्शन राजेंद्र चौरे यांनी केले कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते

डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयात जागतिक सूर्यनमस्कार दिन उत्साहात साजरा

दैनिक प्रभात उपसंपादक तातूर जिल्हा
विष्णू मोहन पोते



तातूर/अहमदपूर: इनरव्हील क्लब आणि शाळेच्या वतीने रथसप्तमी निमित्त जागतिक सूर्यनमस्कार दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात सूर्य देवाची पूजा करुन प्रथमत: सूक्ष्म व्यायाम पद्धती आणि त्यानंतर सूर्यनमस्काराची बारा आवर्तने श्री. एल्पुरवाड जीबी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. यानंतर कार्यक्रमाला उपस्थित इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा शीतल मालु ताई आंतरराष्ट्रीय योग शिक्षिका पुष्पाताई ठाकूर सेवानिवृत्त सहशिक्षिका तसेच योग शिक्षिका भातंबरे मॅडम ज्येष्ठ योग शिक्षिका वतने मॅडम उपस्थित होत्या. यावेळी पुष्पाताई आणि भातंबरे मॅडम यांनी म्युझिक तसेच सूर्याच्या मंत्र उच्चारात बारा आवर्तने घालून प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्रीमती प्रभा मॅडम यांनी मांडले. यानंतर भातंबरे मॅडम यांनी सातत्याने सूर्यनमस्कार साधना केल्यास शारीरिक लाभ तर प्राप्त होतोच पण मंत्र उच्चार तसेच सूर्यनमस्कार केल्यास मानसिक स्थिरता प्राप्त होते. त्याचप्रमाणे तणाव मुक्त करण्यासाठी योग हाच पर्याय आहे म्हणून ' करे योग रहे निरोग' हाच संदेश आपल्या भाषणातून त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री मुसळे एस.आर. यांनी केले. तर या जागतिक सूर्यनमस्कार दिनाच्या कार्यशाळेचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक श्री वेंकटेश भदाडे व शाळेच्या सचिव श्रीमती प्रभाताई यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंद यांनी मेहनत घेतली.

जनतेची काळजी घेणे लोकप्रतिनिधीचे कर्तव्य- कुंदाताई राऊत

रिधोरा येथील मोफत आरोग्य शिबिराला शेकडो लाभार्थ्यांची तुफान गर्दी

आरोग्य शिबिरात आरोग्य सभापती कुंदाताई राऊत यांच्यावर अनेकांची स्तुती सुमने

दै,जनप्रभात /प्रशांत पवार

काटोल:- तालुक्यातील रिधोरा येथे जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सभापती आरोग्य विभाग जिल्हा परिषद नागपूर कुंदाताई राऊत यांच्या पुढाकाराने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते आरोग्य शिबिराला काटोल विधानसभा क्षेत्राचे आमदार अनिल देशमुख प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. अनिल देशमुख यांनी रिधोरा गावाला दिलेल्या फंडाचा उल्लेख करत शेतकऱ्यांच्या समस्या कडे लक्ष घातले कुंदाताई राऊत यांनी नागपूर जिल्ह्यात आरोग्य विभाग तत्परतेने काम करत असून महाराष्ट्रातून नागपूर जिल्हा कर्मचाऱ्यांच्या मदतीने व काँग्रेसचे नेते सुनील बाबू केदार यांच्या मार्गदर्शनात एक नंबर वर आणू असे आश्वासन उपस्थितांना दिले तसेच आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांचे भरती नसल्याने दुःख व्यक्त केले व सरकारच्या नाकर्ते पणावर नाराजी सुद्धा व्यक्त केली. शिबिराला रश्मीताई बर्वे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष मुक्ताताई कोकर्डे जिल्हा परिषद सदस्य पुष्पाताई चाफले जिल्हा आरोग्य अधिकारी रेवतीताई साबळे जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख पंचायत समिती काटोलचे सभापती संजय दादा डांगोरे उपसभापती निशिकांत नागमोते काँग्रेसचे प्रकाश वसु प्रशांत पवार जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष चंद्रशेखर चिखले पंचायत समिती सदस्य अरुण उईके चंदाताई देव्हारे रिधोरा येथील सरपंच वैभव राऊत उपसरपंच संदीप कोठे राष्ट्रवादीच्या वैशालीताई टालाटूले पदम डेहनकर मोहन ठवळे तसेच ग्रामपंचायत सदस्य तालुका आरोग्य अधिकारी काटोल श्री डबरे तसेच जिल्हा परिषद आरोग्य विभागातील कर्मचारी तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटलचे डॉक्टर कचारी सावंगा येथील डॉक्टर कादंबरी तसेच कर्मचारी वर्ग रिधोरा प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रशांत नागपुरे श्री चिमोटे आशा सेविका आरोग्य कर्मचारी पर्यवेक्षक गट ग्रामपंचायत रिधोराचे सचिव समाधान वानखेडे तसेच अंगणवाडी सेविका रिधोरा गावचे गावकरी आजूबाजूच्या गावातील नागरिक उपस्थित होते. रश्मीताई बर्वे तसेच मुक्ताताई कोकर्डे यांनी आपल्या खास शैलीत भाषणाची सुरुवात करून उपस्थित नागरिकांना आरोग्य विषयी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले. आरोग्य शिबिरात कान नाक घसा कॅन्सर डोळे तपासणी यासारख्या इतर आरोग्य तपासणीचा शेकडो शिबिरार्थी नागरिकांनी लाभ घेतला. औषध व तपासणी मोफत असल्याने गावकऱ्यांनी आरोग्य शिबिराबद्दल समाधान मानले. आरोग्य शिबिर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र टेकाडे यांनी केले. आरोग्य शिबिरात रिधोरा येथील रेखाताई तांबूसकर जोशना सोमकुवर राजेंद्र ठाकरे महेंद्र वाघमारे जनार्दन पवार गिरीधर युवनाते दिपाली युवनाते निलेश पवार भाऊसाहेब पवार रामराव डांगोरे बंडू कोढे सुनील डांगोरे अमित मेश्राम मान्यवर नागरिक उपस्थित होते.

वार्षिक महोत्सव सुप्त कला गुण प्रदर्शित करण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ

जिल्हा सत्र न्यायाधीश दिनेश सुराणा

दै,जनप्रभात /नंदू कोल्हे

कामठी:-वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव हे विद्यार्थ्यांना सुप्त कला गुण प्रदर्शित करण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ असून विद्यार्थ्यांनी प्रत्येक स्पर्धेत सहभागी होऊन आपला व आपल्या शाळेचा नाव लौकिक करण्याचे आव्हान जिल्हा सत्र न्यायाधीश दिनेश प्रमोदकुमार सुरांना यांनी नवकार पब्लिक स्कूल च्या वतीने आयोजित वार्षिक महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना व्यक्त केले लाला ओळी कामठी येथील नवकार पब्लिक स्कूल व किड्स कॅसल किडनगार्डन च्या वतीने आयोजित वार्षिक महत्त्व महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा सत्र न्यायाधीश दिनेश प्रमोदकुमार सुरांना यांचे हस्ते दीप प्रज्वलन व सरस्वतीच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करुन करण्यात आले यावेळी दुसरे जिल्हा सत्र न्यायाधीश अनिलकुमार कृष्णमुरारीजी शर्मा ,पुष्पादेवी सुराणा ,माजी आमदार देवराव रडके ,संस्थेचे मार्गदर्शक शेषमल लोढा ,मनीष लोढा, संदीप लोढा ,प्राचार्य मधु लोढा उपस्थित होते वार्षिक मोहोत्साच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हा सत्र न्यायाधीश दिनेश सुरांना म्हणाले वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव हे महत्त्वाचे व्यासपीठ असून प्रत्येक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत सहभागी होऊन आपला व आपल्या शाळेचा नाव लौकिक करण्याचे आव्हान केले ,प्रमुख अतिथी जिल्हा सत्र न्यायाधीश अनिलकुमार शर्मा मार्गदर्शन करताना म्हणाले शाळा ही उत्तम संस्कृत विद्यार्थी घडविण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षक व पालकाचे फार महत्त्वाचे मोलाचे योगदान असल्याचे सांगितले, सोबतच त्यांनी आपल्या बालवयातील शाळेतील अनेक उदाहरण देत प्रत्येक विद्यार्थ्यांनी नेहमी ग आई ,वडील ,गुरु व मोठ्यांचा आशीर्वाद घेऊन प्रत्येक कार्याची सुरुवात करण्याचे आव्हान केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य मधून ओढा यांनी शाळेच्या व संस्थेच्या विविध उपक्रमाची माहिती दिली महोत्सवात विद्यार्थ्यांनी एक नृत्य, समूह नृत्य ,नाटक एका पेक्षा एक बहारदार सादरीकरण केले पाहुण्यांनी व पालकांनी विद्यार्थ्यांच्या नृत्याची वाहवा करीत टाळ्यांचा पाऊस पडला कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी पालक शिक्षक उपस्थित होते



आजपासून महालक्ष्मी सरस प्रदर्शन

नागपुरात पहिल्यांदाच आयोजन २५० स्टॉल्ससह खाद्यपदार्थांची राहणार रेलचेल

नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

दै,जनप्रभात/ दिलीप येवले

नागपूर :- मुंबई येथील महालक्ष्मी सरसला मिळालेल्या भरघोस प्रतिसादामुळे यंदा अतिरिक्त महालक्ष्मी सरस नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे. दिनांक १७ ते २६ फेब्रुवारीपर्यंत रेशीमबाग मैदानावर हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. उद्या सकाळी ११ वाजता केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता समुहांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, चालना मिळावी यासाठी केंद्र व राज्य शासन सतत प्रयत्नशील आहे. या उद्देशाने राज्य पातळीवरील मुंबई येथे महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे ग्राम विकास विभागांतर्गत आयोजन केले जात आहे. या प्रदर्शनापासून अनेक महिला बचत गटांनी प्रेरणा घेतली आहे. नागपूरच्या महालक्ष्मी सरसमध्ये राज्य पातळीवरील निवडक सुमारे २५० स्टॉल असतील. राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला संधी दिली असून यात नागपूर जिल्ह्याचे ११ स्टॉल्स असणार आहेत. नागपूर जिल्ह्यातील भिवापुरी मिरचीने महाराष्ट्राचे लक्ष वेधले असून याचाही स्टॉल राहणार आहे. याचबरोबर गडचिरोलीच्या वन, बांबू उत्पादनांसह कोल्हापुरी चप्पल, पैठणी, कोकणची खेळणी आदी वस्तू ग्राहकांना उपलब्ध होतील. दिवसाला २५ हजार नागरिक प्रदर्शनाला भेट देतील असा अंदाज घेऊन नियोजन केले जात आहे.



महालक्ष्मी सरस प्रदर्शनीचा मुख्य उद्देश देशातील व राज्यातील स्वयंसहाय्यता समुहांतील महिलांनी व ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करुन देणे तसेच समुहांतील सदस्यांना विविध राज्यातील उत्पादने, विक्री व बाजारपेठेची माहिती देणे व राज्या- राज्यातील लोकांचे राहणीमान, खाद्यसंस्कृती व कलाकुसर इत्यादीचा परस्परांना परिचय करुन देणे, शहरी भागातील लोकांना अस्सल ग्रामीण भागातील वस्तू, पदार्थ उपलब्ध होणार आहेत. राज्यभरातील विविध भागांतील वैविध्यपूर्ण चवींचे खाद्यपदार्थ या प्रदर्शनात उपलब्ध होत असल्याने नागपूरकरांना या प्रदर्शनाच्या निमित्ताने मेजवानीच मिळणार आहे. राज्यस्तरावरील या प्रदर्शनात नेहमी सहभागी होत असलेले सर्व प्रकारचे स्टॉल्स या प्रदर्शनात असणार आहेत अभियानाला प्रचार व प्रसिद्धी तसेच महिलांच्या उत्पादनांना राज्यातील इतर मोठ्या शहरात मागणी व प्रसिद्धी मिळेल.सकाळी दहा ते रात्री दहा सुरु राहणार प्रदर्शन महालक्ष्मी सरस हे प्रदर्शन सकाळी दहा ते रात्री दहापर्यंत सुरु राहणार आहे. सरसच्या आयोजनामुळे विदर्भातील स्वयंसहाय्यता गटांना बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी व त्यांच्या उत्पादकतेला तसेच व्यावसायिकतेला चालना मिळण्यासाठी यातून मोठी मदत होणार आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी नागपूरकरांनी आणि परिसरातील नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घेतला तयारीचा आढावा महालक्ष्मी सरसचा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांनी आज आढावा घेतला. प्रशासनातर्फे प्रदर्शनाची तयारी पूर्णत्वास आली आहे. प्रदर्शनाविषयी आवश्यक सूचना करीत श्रीमती शर्मा यांनी तयारीचा आढावा घेतला.

कन्हान शहर विकास मंच डरे शहिदांना श्रद्धांजली

दै,जनप्रभात / नंदू कोल्हे

कन्हान :- जम्मू – काश्मीर मधील पुलवामा येथे झालेल्या दहशतवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या शूर जवानांना कन्हान शहर विकास मंच च्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली .१४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर भारतीय सुरक्षा जवानांना घेऊन जाणाऱ्या सीआरपीएफ वाहनांच्या ताफ्यावर दहशतवाद्यांनी हल्ला केला . ज्या मध्ये देशाचे ४० हून अधिक शुर जवान शहीद झाले होते . जम्मू-काश्मीर मधील पुलवामा जिल्ह्यातील अवंतीपोरा जवळील लेथपोरा भागात हा हल्ला झाला होता . बुधवारी (दि.१४) फेब्रुवारी ला या दहशतवाद्यांच्या हल्ल्याला चार वर्षे पूर्ण झाल्याने कन्हान शहर विकास मंच च्या वतीने तारसा रोड शहीद चौक येथे श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित मंच मार्गदर्शक भरत सावळे , शिक्षक शैलेश सोलंकी यांच्या हस्ते शहिद प्रकाश देशमुख यांच्या प्रतिमेला आणि स्मारकावर पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात केली . मंच पदाधिकाऱ्यांनी शहीद प्रकाश देशमुख आणि स्मारकावर पुष्प अर्पित करुन व दोन मिनिटाचा मौन पाळून शहिद झालेल्या शुर जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली . या प्रसंगी कन्हान शहर विकास मंच संस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर , मार्गदर्शक भरत सावळे , प्रभाकर रुंघे , प्रदीप बावने , महेर इंचुलकर , राहुल सोनबरसे , अर्जुन पात्रे , रंजनिश मेश्राम , कु.अनु मेश्राम , सुनिल हारोडे , शुभम नागमोते , हर्षल नेवारे , श्रवण पात्रे , हर्षल ठाकरे , उमेश मेश्राम , बादल मडावी सह आदि नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते .

सूर्यनमस्कार मंडळाच्यावतीने ७५,००० हजार सूर्यनमस्काराचा संकल्प १०० लिटर दूध वाटून पूर्ण

एकूण सूर्यनमस्कार ८९९१८ टाकण्यात आले





अतुल ढंढारे / प्रतिनिधी

नरखेड : तालुक्यातील सावरगांव येथील श्री मुनीश्वर महाराज देवस्थान येथे सूर्यनमस्कार मंडळाच्यावतीने पौष महिन्या निमित १२ जानेवारी पासून दररोज सकाळी ६ ते ७ वाजता पर्यंत सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले होते.त्यानिमित्त सूर्यनमस्कार मंडळाच्यावतीने ७५,००० सूर्यनमस्काराचा संकल्प करण्यात आला होता. आज रथसप्तमी व जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त सूर्यनमस्कार मंडळाच्या वतीने ७५,००० हजार सूर्यनमस्काराचा संकल्प पूर्ण करून १०० लिटर दुधाचा प्रसाद वाटून संकल्प पूर्ण करण्यात आला.यावेळी पौष महिन्यात एकूण ८९९१८ सूर्यनमस्कार टाकण्यात आल्याची माहिती मंडळाचे वतीने देण्यात आली. उद्या १७ तारखेला श्री मुनीश्वर महाराज यांच्या समाधीचा अभिषेक व पूजा करून भजन झाल्यानंतर ११ कुंडी गायत्री यज्ञ संपन्न होईल व पूर्णाहुती देऊन कार्यक्रमाचा समारोप होईल व त्यानंतर दुपारी १:०० वाजता महाप्रसाद वितरित करण्यात येईल व कार्यक्रमाची सांगता करण्यात येईल. कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन सूर्यनमस्कार मंडळाचे वतीने करण्यात आले आहे.

वने मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची देवलापार गो-विज्ञान अनुसंधान संशोधन केंद्रास भेट

दै,जनप्रभात नागपूर, दिलीप येवले: वने, सांस्कृतिक कार्य ,मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज देवलापार येथील गो-विज्ञान अनुसंधान केंद्रास भेट दिली. पेंच व्याघ्र प्रकल्पातील विविध विकास कामे व उपक्रमांच्या उद्घाटनानंतर श्री मुनगंटीवार यांनी सायंकाळी गो-विज्ञान अनुसंधान केंद्रास भेट दिली. ॲड. आशिष जयस्वाल,गो-विज्ञान अनुसंधान केंद्राचे अध्यक्ष पचेश गुप्ता, मुख्याधिकारी डॉ मनोज तत्ववादी, कोषाध्यक्ष हितेंद्र चोपकर, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक शोमिता विश्वास, नागपूर वन वृत्ताच्या वनसंरक्षक श्री लक्ष्मी आदी यावेळी उपस्थित होते. श्री. मुनगंटीवार यांनी येथील कामधेनु पंचगव्य आयुर्वेद भवनाची पाहणी केली. येथील अवलेह विभाग, वटी विभाग, तेल विभाग, इंधन विभाग, सिरप विभाग, प्रयोगशाळा आदींना भेट दिली. येथे निर्माण होणारे फलघृत, हिंग्वाद्यघृत, अष्टमंगलघृत, गोमुत्र अर्क, दंतमंजन आदी ३० पेक्षा जास्त उत्पादनांची माहितीही त्यांनी घेतली. यावेळी अनुसंधान केंद्राच्यावतीने शाल व श्रीफळ देऊन श्री. मुनगंटीवार यांचा सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी, या आयुर्वेद भवनाच्या परिसरात श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



एक्सप्रेस रेल्वे गाड्यांचा थांबा हिंगणघाट रेल्वे स्टेशनला द्या!

रेल्वेमंत्र्याची भेट घेऊन प्रश्न निकाली काढणार : खा. तडस

दै,जनप्रभात
प्रतिनिधि - अब्दुत कदीर बख्श



हिंगणघाट : हिंगणघाट रेल्वे येथे एक्सप्रेस गाड्यांचा थांबा मिळावा या करिता गुरुवार दि. १५ रोजी वर्धा-बल्लारशाह यात्री संघाकडुन अध्यक्ष राजेश कोचर यांनी खा. रामदास तडस यांची वर्धा कार्यालयात भेट घेतली. वर्धा-बल्लारशाह यात्री संघाकडुन खा. रामदास तडस यांना हिंगणघाट रेल्वे स्टेशन गाड्यांचा थांबा संबंधित चर्चा करुन सविस्तर माहिती दिली.

वर्धा-बल्लारशाह यात्री संघ यांच्या नेतृत्वात गेल्या पाच वर्षांपासून हिंगनघाट रेल्वे स्टेशनला एक्सप्रेस गाड्यांचा थांबा मिळावा म्हणून भरपूर आंदोलने चर्चा बैठकी झाल्या परंतु हिंगनघाट रेल्वे स्टेशनला थांबा मिळत नसुन फक्त सहानुभूती पत्र व आश्वासन मिळत आहे. कोविडच्या आधी हिंगनघाट रेल्वे स्टेशनला एक्सप्रेस गाड्यांचा थांबा होता. परंतु कोविड परिस्थिती सामान्य झाल्यानंतरही गाड्याचा थांबा सुरु न झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक परिस्थिती खराब होतं चाललेली आहे व आता लवकरच परीक्षा सुद्धा सुरु होणार आहे. हिंगनघाट रेल्वे स्टेशन वरुन अनेक गावातील विद्यार्थी वर्धा, नागपूर, अमरावती या शहरांमध्ये उच्च शिक्षणाकरिता जातात, आणि रेल्वे प्रवास हेच एकमेव साधन आहे.

रेल्वे प्रशासनाने फक्त आश्वासने आणि सहानुभूती पत्र दिले परंतु गाड्यांचा थांबा सुरु केला नाही त्यामुळे तुम्ही यामध्ये मध्यस्थी घेऊन लवकरच गाड्यांचा थांबा सुरु करावा अशी चर्चा करण्यात आली. लवकरच प्रलंबित रेल्वे गाड्यांच्या थांबाचा प्रश्न मार्गी लावणार व स्वतः रेल्वे मंत्र्यांसोबत व अधिकारी यांच्या सोबत चर्चा करुन हा प्रश्न लवकर मार्गी लावणार असे वर्धा-बल्लारशा संघाला खा. रामदास तडस यांनी सांगितले.

या निवेदनात बल्लारशाह-मुंबई ट्रेन रोज सुरु करावी, बल्लारशाह-पुणे ही गाडी रोज सुरु करावी, काजीपेट-पुणे ही एक्सप्रेस साप्ताहिक आहे तीला रोज सुरु करण्यात यावे, भुसावळ-वर्धा मेमो पॅसेंजर बल्लारशाह पर्यंत वाढवावी, बल्लारशाह- वर्धा मेमो प्रवाशांनी वेळेवर प्रवास करावा, नागपूर मांजरी-आदिलाबाद पॅसेंजर सुरु करावी, अजनी-काजीपेट पॅसेंजर सुरु करावी आणि कोरबा, इंदौर, रायपूर, जोधपूर, हिसरा (बिकानेर), धनबाद-कोल्हापूर एक्सप्रेस या रेल्वे गाड्यांचा अप आणि डाऊन रेल्वे थांबा हिंगणघाट रेल्वे स्टेशन देण्यात यावा, हिंगणघाट रेल्वे स्थानकावर सर्व प्रकारच्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, बल्लारशाह स्टेशनवर पिठ लाईन लवकर सुरु करावे, नागपुर-बल्लारशाह सेक्शनमध्ये मेट्रो सुरु करावे, दक्षिणेकडे जाण्यासाठी फूट ब्रिज बांधावा आदी विविध मागण्यांसाठी वर्धा-बल्लारशाह यात्री संघटनेतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, परिवहन मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी खा. हंसराज अहीर, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, खा. रामदास तडस, आ. समीर कुणावार, महाप्रबंधक रामकरण यादव मुंबई यांना या मागण्या प्रामुख्याने करण्यात आल्या. रेल्वे गाड्यांचा पुन्हा थांबा देण्यात यावा अशी मागणीचे निवेदन यात्री संघाचे अध्यक्ष राजेश अ. कोचर, सचिव डि.के. गुरनुले, विजय मुथ्था, दिलीप बालपांडे, रवि जुमडे, मो. शहजाद, लिलाधर मडावी, ग्रा. किरण वैद्य, चंदशेखर खापरे, संजय खत्री आदींची उपस्थिती होती.

गारपिट नुकसान ग्रस्त गावांची तहसिलदार कपिल हाटकर यांच्याकडून बांधावर जाऊन पाहणी:

नुकसानीची घेतला आढावा

दै,जनप्रभात
तालुका प्रतिनिधी अमोल झाडे



समुद्रपुर:-शेतकऱ्यां मागे लागलेली संकटाची मालिका कधी कमी व्हायचे नावच घेत नाही कधी अतिवृष्टी तर कधी पावसाचा खंड यातून पिक बाचले तर पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव यातूनही कसं बसं पिक हाती आलं तर बाजार पिकाला कवळी मोल दर हि आसमानी संकट व सुलतानी संकटाची मालिका शेतकऱ्यांच्या मुळाशी लागली आहे.यंदा सोयाबीन व कापूस पिकाचे उत्पादन कमी झाले आता शेतकऱ्यांची भिस्त रब्बीच्या पिकावर असतांनाच तालुक्यातील अनेक गावांमध्ये रविवारी सायंकाळच्या सुमारास बादळीवाऱ्यासह गारपिटी झाली असून या गारपिटीमुळे रब्बी हंगामातील कापणीला आलेला हरबरा,गहु ज्वारी तसेच शेवटच्या वेचणीला असलेल्या कापूस पिकाचे नुकसान झाल्याची माहिती तहसीलदार कपिल हाटकर यांना मिळताच त्यांनी स्वता सरपंच विलास नवघरे, सरपंच राजु नौकरकर,मंडल अधिकारी ज्ञानेश्वर कापकर, तलाठी विनोद खैकरे कोतवाल शुभम देहारी, मंडल कृषी अधिकारी मनोज गायधने,पोलिस दिलीप देरकर ,कृषि सहाय्यक राम अरगडे, यांच्या उपस्थितीतपिपरी,रासा, गिरड, केसलापार, गावाला भेट देऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली.तर कांढळी परीसरात नायब तहसीलदार राजेंद्र सयाम यांनी मंडळ अधिकारी तलाठी कृषी विभागाचे कर्मचारी यांना घेऊन नुसकानीची पाहणी केली.नंदोरी परीसरात नायब तहसीलदार संजय काटपातल यांनी मंडळ अधिकारी तलाठी कृषी विभागाचे कर्मचारी यांना घेऊन नुसकानीची पाहणी केली.यावेळी या गारपिटीमुळे गिरड, नंदोरी, कांढळी परीसरात गारपिटीमुळे हरभरा गहू ज्वारी कापुस भाजीपाला,या पिकांचे काही प्रमाणात नुकसान झाल्याचे प्रथम दर्शनी आढळून आले असून संबंधित मंडल अधिकारी व तलाठी कृषी सेवकांना सविस्तर पंचनामे करण्याचे आदेश दिल्याची माहिती तहसीलदार कपिल हाटकर यांनी दिली आहे. यंदा सोयाबीन व कापूस पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घट झाली असून बाजारात सोयाबीन व कापूस कवडीमोल दरात विकल्या जात आहे.अशातच शेतकऱ्यांची अपेक्षा हरभरा गहू ज्वारी व शेवटच्या वेचणीच्या कापसावर असतांना या अवकाळी बादळीवाऱ्यासह गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने तातडीने पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

कचारी सावंगा येथील माजी पोलीस पाटील प्रमोद मेहर यांचे निधन



दै,जनप्रभात काटोल :- तालुक्यातील कचारी सावंगा येथील माजी पोलीस पाटील प्रमोद मेहर यांचे दीर्घ आजाराने गुरुवारी (१५ फेब्रुवारी) निधन झाले. ते ६२ वर्षांचे होते. स्वर्गीय प्रमोद मेहर हे विदर्भ पोलीस पाटील संघटनेचे माजी कार्याध्यक्ष होते. पोलीस पाटलांच्या विविध मागण्यांसाठी त्यांनी सतत संघर्ष केला आहे. त्याचप्रमाणे विविध सामाजिक संघटनांमध्ये त्यांचा सहभाग होता. नागपूर ग्रामीणचे माजी पोलीस अधीक्षक डॉ. मनोजकुमार शर्मा यांच्या हस्ते २०११ या वर्षी उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून त्यांचा सत्कार करण्यात आला होता. मागील काही दिवसांपासून आजारामुळे तब्येत खालावली होती. गुरुवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. स्थानिक समशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, पुतणे आणि नातवंड असा आप्त परिवार आहे.

नरखेडमध्ये आप ला गळती शेकडो कार्यकर्ते भाजपात:









दै,जनप्रभात
नरखेड प्रतिनिधी.-

देशात पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी आणि महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांचे विकासाला प्राधान्य देणारे व जनकल्याणकारी योजना राबवणारे सक्षम नेतृत्व आहे त्यामुळेच चिखली मतदारसंघातही विकासाचे वारे वाहत असून याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातील जनता भाजपाकडे मोठ्या संख्येने आकर्षित होत आहे.नरखेड येथे जनसेवेसाठी सदैव कटिबद्ध असलेल्या भारतीय जनता पक्षात प्रभावित होऊन आम आदमी पार्टीचे तालुका अध्यक्ष विनोद क्षिरसागर , शहर अध्यक्ष लिलाधर कळंबे ,उपाध्यक्ष शंकर मेहेंद्रे, शहर संघटक बब्बु शेख , महिला आघाडी अध्यक्ष ममता गौरखेडे, तरुण बालपांडे, रविंद्र काटे,गजानन सोनटक्के, संजय कांबळे, इंदुबाई पंचभाई,छायाताई कडबे, इंदिरा ढोके यांच्यासह शेकडो महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी आम आदमी पक्षाला रामराम ठोकत भाजपात प्रवेश केला. या कार्यक्रमात सर्व नवीन कार्यकर्त्यांना भाजपचा दुपट्टा गळ्यात घालत पक्षप्रवेशाच्या शुभेच्छा देत भाजपा नेते मनोज कोरडे, शहर अध्यक्ष राजेश क्षिरसागर,माजी नगरसेवक प्रशांत खुरसंगे, अनुसूचित जाती जिल्हा महामंत्री मनीष दुर्गे यांनी मार्गदर्शन केले. शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपात झालेला हा प्रवेश म्हणजे नरखेड शहरात भाजपचा झंझावात आता कोणीही रोखू शकणार नाही हेच सांगत आहे.या पक्षप्रवेश सोहळ्याप्रसंगी दिव्यांग आघाडी जिल्हा महामंत्री रमेश क्षिरसागर, भाजपा महामंत्री सुनिल मोहोड, अशोक कळंबे, दिपक बेहेरे, युवा मोर्चा अध्यक्ष सारंग दळवी, किसान आघाडी अध्यक्ष सुभाष केवटे, रामचंद्र बागडे, शरद मदनकर, प्रकाश सनेशर, सुनील सोनटक्के, संदीप मेतकर, गजानन अलोने, प्रशांत बालपांडे, खुशाल रेवतकर,शरद वैद्य, गणेश कोरडे, तुकाराम रेवतकर, विठ्ठल बगळे, गौरव वैद्य, भागवत देवतळे, शंकर सांबारे व अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

****

धोडगांव वळणावर दुचाकी अनियंत्रित होऊन लोखंडी रॅलिंगवर जाऊन धडकली:

दुचाकीस्वार एक गंभीर एक किरकोळ जखमी

दै,जनप्रभात
तालुका प्रतिनिधी
अमोल झाडे समुद्रपुर

समुद्रपुर:-तालुक्यातील हिंगणघाट उमरेड मार्गावरील धोडगांव वळणावर गिरडकडे येत असलेली दुचाकी अनियंत्रित होऊन लोखंडी रॅलिंगवर जाऊन धडकली या अपघात एक दुचाकीस्वार गंभीर तर एक किरकोळ जखमी झाला. प्राप्त माहितीनुसार १६ फेब्रुवारीला २ वाजताच्या सुमारास वर्धा वरुन गिरडकडे येत असलेली दुचाकी क्रमांक एम एच ३१ एच १६५९ अनियंत्रित होऊन वळणावरील लोखंडी रॅलिंगवर जाऊन धडकली या अपघात दुचाकीस्वार तेजस तुलसीदास साबळे वय २१ वर्ष रा वर्धा गंभीर जखमी झाला तर चंद्रकांत मनोज मेश्राम वय १९ वर्ष रा वर्धा हा किरकोळ जखमी झाला.घटनेची माहिती मिळताच ठाणेदार संदिप गाडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस कर्मचारी कृष्णा हुरर्ल यांनी घटनास्थळी जाऊन दोन्ही जखमींना उपचारासाठी गिरड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र रवाना केले.यावेळी दोन्ही जखमींवर उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी सेवाग्राम रुग्णालयात हलविण्यात आले.पोलिस कर्मचारी पंचम कोडगिलवार,शंकर नैताम यांनी रुग्णालयात जाऊन पंचनामा केला या संबंधी गिरड पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असुन पुढील तपास पोलीस करीत आहे.



जनतेची काळजी घेणे लोकप्रतिनिधीचे कर्तव्य- कुंदाताई राऊत

रिधोरा येथील मोफत आरोग्य शिबिराला शेकडो लाभार्थ्यांची तुफान गर्दी

आरोग्य शिबिरात आरोग्य सभापती कुंदाताई राऊत यांच्यावर अनेकांची स्तुती सुमने

दै,जनप्रभात
काटोल/प्रशांत पवार

काटोल तालुक्यातील रिधोरा येथे जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सभापती आरोग्य विभाग जिल्हा परिषद नागपूर कुंदाताई राऊत यांच्या पुढाकाराने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते आरोग्य शिबिराला काटोल विधानसभा क्षेत्राचे आमदार अनिल देशमुख प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. अनिल देशमुख यांनी रिधोरा गावाला दिलेल्या फंडाचा उल्लेख करत शेतकऱ्यांच्या समस्या कडे लक्ष घातले कुंदाताई राऊत यांनी नागपूर जिल्ह्यात आरोग्य विभाग तत्परतेने काम करत असून महाराष्ट्रातून नागपूर जिल्हा कर्मचाऱ्यांच्या मदतीने व काँग्रेसचे नेते सुनील बाबू केदार देव्हारे यांच्या मार्गदर्शनात एक नंबर वर आणू असे आश्वासन उपस्थितांना दिले तसेच आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांचे भरती नसल्याने दुःख व्यक्त केले व सरकारच्या नाकर्ते पणावर नाराजी सुद्धा व्यक्त केली. शिबिराला रश्मीताई बर्वे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष मुक्ताताई कोकर्डे जिल्हा परिषद सदस्य पुष्पाताई चाफले जिल्हा आरोग्य अधिकारी रेवतीताई साबळे जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख पंचायत समिती काटोलचे सभापती संजय दादा डांगोरे उपसभापती निशिकांत नागमोते काँग्रेसचे प्रकाश वसु प्रशांत पवार जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष चंद्रशेखर चिखले पंचायत समिती सदस्य अरुण उईके चंदाताई राऊत उपसरपंच संदीप कोठे राष्ट्रवादीच्या वैशालीताई टालाटूले ले तसेच ग्रामपंचायत सदस्य तालुका आरोग्य अधिकारी काटोल श्री डवरे तसेच जिल्हा परिषद आरोग्य विभागातील कर्मचारी तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटलचे डॉक्टर कचारी सावंगा येथील डॉक्टर कादंबरी तसेच कर्मचारी बर्ग रिधोरा प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रशांत नागपुरे श्री चिमोटे आशा सेविका आरोग्य कर्मचारी पर्यवेक्षक गट ग्रामपंचायत रिधोराचे सचिव समाधान वानखेडे तसेच अंगणवाडी सेविका रिधोरा गावचे गावकरी आजूबाजूच्या गावातील नागरिक उपस्थित होते. रश्मीताई बर्वे तसेच मुक्ताताई कोकर्डे यांनी आपल्या खास शैलीत भाषणाची सुरुवात करून उपस्थित नागरिकांना आरोग्य विषयी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले. आरोग्य शिबिरात कान नाक घसा कॅन्सर डोळे तपासणी यासारख्या इतर आरोग्य तपासणीचा शेकडो शिबिरार्थी नागरिकांनी लाभ घेतला. औषध व तपासणी मोफत असल्याने गावकऱ्यांनी आरोग्य शिबिराबद्दल समाधान मानले. आरोग्य शिबिर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र टेकाडे यांनी केले. आरोग्य शिबिरात रिधोरा येथील रेखाताई तांबूसकर जोशना सोमकुवर राजेंद्र ठाकरे महेंद्र वाघमारे जनार्दन पवार गिरीधर युवनाते दिपाली युवनाते निलेश पवार भाऊसाहेब पवार रामराव डांगोरे चंदू कोढे सुनील डांगोरे अमित मेश्राम मान्यवर नागरिक उपस्थित होते.



महिला लोकशाही दिन २० फेब्रुवारीला

दै,जनप्रभात /दिलीप येबले

नागपूर, : महिला लोकशाही दिन जिल्हास्तरावर प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी व तालुकास्तरावर महिन्याच्या चौथ्या सोमवारी राबविण्यात येतो. शिवजयंतीनिमित्त सोमवार दि. १९ फेब्रुवारी रोजी शासकीय सुट्टी असल्यामुळे जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन मंगळवार दि. २० फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात येणार आहे.

समस्याग्रस्त व पीडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा, यादृष्टीने महिलांच्या तक्रारी व अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी व समाजातील पीडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो.

लोकशाही दिनाच्या तक्रारीचे निकष याप्रमाणे आहेत. अर्ज विहित नमुन्यात असावा. तक्रार अर्ज दोन प्रतीत सादर करावा. तक्रार व निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे. न्यायप्रविष्ट प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक कागदपत्रांच्या प्रती न जोडलेला अर्ज, सेवा विषयक, आस्थापना विषयक बाबी तसेच तक्रार व निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

पीएम किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत संपृक्तता साध्यतेसाठी २१ फेब्रुवारीपर्यंत विशेष मोहीम

ई-केवायसी प्रमाणीकरण आवश्यक

दै,जनप्रभात /दिलीप येबले

नागपूर, : शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून सावरता यावे, त्यांना आर्थिक सहाय्य व्हावे या उद्देशाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना महत्त्वपूर्ण ठरली आहे. या योजनेच्या संपृक्तता साध्यतेसाठी राबविलेल्या विशेष मोहिमेत सुमारे १.९४ लाख शेतकऱ्यांचे ई-केवायसी व ३.०१ लाख स्वयंनोदंणीकृत शेतकऱ्यांची नव्याने नोंदणी करण्यात आली. तथापि राज्यातील एकूण १.९४ शेतकऱ्यांनी योजनेच्या लाभासाठी आवश्यक असलेल्या बाबींची पूर्तता केली असून त्यांचे केवळ ई- केवायसी बाकी आहे. या योजनेत समावेश व लाभासाठी ई- केवायसी प्रमाणीकरण आवश्यक असून सामाईक सुविधा केंद्रामार्फत ई-केवायसी प्रमाणीकरण करण्यासाठी २१ फेब्रुवारी २०२४ पर्यंत विशेष मोहीम हाती घेतल्याची माहिती कृषी विभागाने प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.विशेष मोहिमेंतर्गत ई-केवायसी प्रमाणीकरण करणे, योजनेसाठी नव्याने नोंदणी करणे, बँक खाती आधार क्रमांकाला जोडणे आदी बाबींची पूर्तता करण्यासाठी शेतकऱ्यांनी समक्ष हजर राहणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी ई- केवायसी प्रमाणीकरण करण्यासाठी मोबाईलवरील ओटीपी, सामाईक सुविधा केंद्र, पी. एम. किसान फेस ऑथेंटिकेशन यापैकी एका सुविधेचा वापर करावा. बँक खाती आधार संलग्न नसलेल्या शेतक-यांनी नजीकच्या पोस्ट कार्यालयामध्ये आधार संलग्न खाते उघडावे. पी. एम. किसान योजनेच्या १६ व्या हप्त्याचा लाभ या फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात वितरित करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे यांनी केले आहे.

वने आणि वन्यजीव संवर्धनासाठी जनतेनी पुढाकार घ्यावा - वने मंत्री सुधीर मुगंटीवार

वने मंत्री यांच्या हस्ते पेंच व्याघ्र प्रकल्पातील विविध उपक्रमांचा शुभारंभ






दै,जनप्रभात /दिलीप येबले

नागपूर, : पर्यावरण आणि मानवी समाजाच्या विकासात वने, वन्यजीवांचे अनन्य साधारण महत्व असून त्यांच्या संवर्धनासाठी जनतेने पुढाकार घ्यावा,असे आवाहन वने सांस्कृतिक कार्य,मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज पेंच व्याघ्र प्रकल्पात विविध विकासात्मक कामे व उपक्रमांच्या उद्घाटन प्रसंगी केले.

श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते आज पेंच व्याघ्र प्रकल्पातील खुर्सापार नूतन सफारी गेट, कोलितमारा येथे परमोटरींग व हॉट एअर बलून हा साहसी क्रीडा उपक्रम, बाघोली तलाव येथे डार्क स्काय प्रकल्प आणि हत्ती कॅम्प, सिल्लारी येथे पर्यावरणपूरक पेयजल प्रकल्पाचे उद्घाटन आदिंसह विविध उपक्रमांचा शुभारंभ झाला या प्रसंगी ते बोलत होते.

आमदार ॲड. आशिष जयस्वाल, जिल्हा परिषदेच्या सदस्य शांता कुमरे, पिपरिया गावचे सरपंच प्रवीण उईके,प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक शोमिता विश्वास, नागपूर वन वृत्ताच्या वनसंरक्षक श्री लक्ष्मी,पेंच व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. प्रभुनाथ शुक्ल आदी यावेळी उपस्थित होते.

श्री. मुनगंटीवार म्हणाले, पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये वन्य प्राण्यांचा अधिवास वाढविण्यास उत्तम कार्य झाले आहे. या व्याघ्र प्रकल्पासह राज्यातील अन्य व्याघ्र प्रकल्प आणि वन विभागात सर्व महत्वाची संसाधने उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. राज्य शासनाने वनक्षेत्रातील जनतेच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. आस्थापना खर्च वजात करुन तेंदूपत्ता मजुरांना ७२ कोटी रुपयांचे बोनस देण्यात आले आहे. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत झालेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना २५ लाखांची सानुग्रह मदत करण्यात येते. या दोन्ही तरतुदी देशात फक्त महाराष्ट्रानेच केल्याचे त्यांनी नमूद केले.

वटवृक्ष वाढीसाठी वन विभागाने शासन निर्णय काढला असून वड,पिंपळ आदी वृक्षांची लागवड व्हावी आणि वृक्ष जगवणारे हात वाढले पाहिजे.वृक्ष, वन्यजिवांचा अधिवास वाढविण्यासाठी प्रयत्न व्हावेत,असेही श्री. मुनगंटीवार म्हणाले. १ ते ३ मार्च २०२४ दरम्यान चंद्रपूर येथे 'ताडोबा महोत्सव' आयोजित करण्यात येणार असून देशभरातील वनमंत्री यात सहभागी होणार असल्याचेही श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले.

पाच उपक्रमांचे आभासी पद्धतीने उद्घाटन या कार्यक्रमात आवळेघाट येथील स्वराज दुग्धसंकलन केंद्र, नागलवाडी येथील प्रगती अगरबत्ती निर्माण केंद्र,सुवरधरा येथील सुवरधरा शिलाई केंद्र, नरहर येथील वंदे मातरम वन ई-सेवा केंद्र आणि जटायु (गिधाड) संवर्धन प्रकल्पाचे श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते आभासीपद्धतीने उद्घाटन करण्यात आले.

पेंच व्याघ्र प्रकल्पातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचारी व स्थानिक नागरिकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.तीन वनरक्षकांना 'स्टार ऑफ द मंथ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जलद बचाव दलामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना यावेळी गौरविण्यात आले. प्राथमिक प्रतिसाद दलातील दोन कर्मचाऱ्यांनाही गौरविण्यात आले. 'अंगार मुक्त पेंच स्पर्धेती'ल विजेत्या पाच ग्रामपंचायतींना यावेळी सन्मानित करण्यात आले. जबाबदारीडरे प्रकल्पाला व्यावसायिक सामाजिक (सीएसआर) पेंच व्याघ्र विविध विकासात्मक कामांसाठी निधी उपलब्ध करून देणाऱ्या संस्थांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. याच कार्यक्रमात श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते 'पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या कॉफीटेबल बुक' आणि 'पक्षी सर्वेक्षण अहवाला'चे विमोचन करण्यात आले.

ॲड. आशिष जयस्वाल यांनीही उपस्थितांना संबोधित केले. महिप गुप्ता यांनी प्रास्ताविक केले तर रेणुका देशकर यांनी सूत्रसंचालन केले.

तत्पूर्वी, श्री मुनगंटीवार यांनी पेंच व्याघ्र प्रकल्पास भेट देत येथील विविध विकास कामांचे उद्घाटन केले. सर्वप्रथम त्यांनी खुर्सापार नूतन सफारी गेटचे उद्घाटन केले. येथेच त्यांनी निसर्ग मार्गदर्शक आणि जिप्सी चालक यांना गणवेश वाटप केले. व्यावसायिक सामाजिक जबाबदारीडरे (सीएसआर) पेंच व्याघ्र प्रकल्पास देण्यात आलेल्या जेसीबीचे हस्तांतरण श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले.या परिसरातील तिकीट घर, स्मरणिका व वस्तू विक्री केंद्र, उपहारगृह, स्वच्छतागृह,सुसज्ज कार्यालयाचेही उद्घाटन त्यांनी केले.

पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या सील्लारी गेट परिसरातील विविध उपक्रमांचे श्री.मुनगंटीवार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. येथील पिपरिया गावाशेजारील कोलितमारा येथे परमोटरींग व हॉट एअर बलून हा साहसी क्रीडा उपक्रमाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते पार पडले.बाघोली तलाव येथे 'डार्क स्काय प्रकल्प' आणि 'हत्ती कॅम्पचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले. अमलतास येथे श्री.मुनगंटीवार यांनी विविध उपक्रमांच्या स्टॉल्सला भेट दिली व पाहणी केली.

****

माघी गणेशोत्सव निमित्त माननिय अपूर्वाताई सामंत यांनी दळे (मठवाडी) ता.राजापूर येथे गणरायाचे घेतले दर्शन



दै,जनप्रभात
ता.प्रतिनिधी/प्रशांत पोवार

राजापूर:- १६ फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्राचे उद्योगमंत्री व रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री ना.मा.उदयजी सामंत यांच्या बंधुंच्या(मा. किरणजी सामंत) सुकन्या मा.अपूर्वाताई सामंत यांनी मौजे दळे (मठवाडी);ता.राजापूर येथे सध्या साजरा होत असलेल्या माघी गणेशोत्सवानिमित्त सदिच्छा भेट देवून गणरायांचे दर्शन घेतले.

यावेळी उपस्थित असणाऱ्या भाविकांतर्फे अपूर्वाताईंचा उचित सत्कार करण्यात आला.

यावेळी सदर मंडळाचे अध्यक्ष श्री.विनोद गिरी व शाखाप्रमुख श्री गणेश गिरी यांनी अपूर्वाताईंनी मा.पालकमंत्री मा.ना.श्री उदयजी सामंत व तालुकाप्रमुख मा.श्री. दिपकजी नागले यांच्या प्रयत्नाने मठवाडी दळे येथील खूप वर्षे रखडलेल्या विकासकामांना भरघोस निधी देवून मार्गी लावल्याबद्दल व यावेळी मंडळालाहीअपूर्वाताईंनी भरघोस देणगी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

व आम्ही सर्व ग्रामस्थ आपल्या मागे राहू अशी ग्वाही दिली. यावेळी उपतालुकाप्रमुख मा.श्री. उल्हासजी आंबोळकर,सागवे विभागप्रमुख मा.श्री. प्रशांतजी गावकर,सागवे महिला विभागप्रमुख मा.सौ.जान्हवीताई गावकर,उपविभागप्रमुख मा.श्री.सत्यवानजी आडीवरेकर,उपविभागप्रमुख मा.श्री राजनजी कोंडेकर,महिला उपविभागप्रमुख सौ.सिध्दीताई शिर्सेकर व विभागातील युवा विभागप्रमुख श्री.संकेतजी कांबळी,युवा उपविभागप्रमुख श्री.कुणाल गिरी तसेच शाखाप्रमुख श्री.शशांक शिरवडकर,श्री.संदिप कदम,श्री.कुंदन आडीवरेकर,श्रीम.मंदाताई वाडेकर व सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. सत्यवानजी जाधव श्री. सर्फराजभाई काझी आणि इतर मा.पदाधिकारी व तमाम गणेशभक्त शिवसैनिक उपस्थित होते.

कन्हान शहर विकास मंच डरे शहिदांना श्रद्धांजली

दै,जनप्रभात/नंदू कोल्हे

कन्हान :- जम्मू - काश्मीर मधील पुलवामा येथे झालेल्या दहशतवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या शूर जवानांना कन्हान शहर विकास मंच च्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली . १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर भारतीय सुरक्षा जवानांना घेऊन जाणाऱ्या सीआरपीएफ वाहनांच्या ताफ्यावर दहशतवाद्यांनी हल्ला केला . ज्या मध्ये देशाचे ४० हून अधिक शूर जवान शहीद झाले होते . जम्मू-काश्मीर मधील पुलवामा जिल्ह्यातील अवंतीपोरा जवळील लेथपोरा भागात हा हल्ला झाला होता . बुधवारी (दि.१४) फेब्रुवारी ला या दहशतवाद्यांच्या हल्ल्याला चार वर्षे पूर्ण झाल्याने कन्हान शहर विकास मंच च्या वतीने तारसा रोड शहीद चौक येथे श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित मंच मार्गदर्शक भरत सावळे , शिक्षक शैलेश सोलंकी यांच्या हस्ते शहिद प्रकाश देशमुख यांच्या प्रतिमेला आणि स्मारकावर पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली . मंच पदाधिकाऱ्यांनी शहीद प्रकाश देशमुख आणि स्मारकावर पुष्प अर्पित करुन व दोन मिनिटाचा मौन पाळून शहिद झालेल्या शूर जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली .या प्रसंगी कन्हान शहर विकास मंच सस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर , मार्गदर्शक भरत सावळे , प्रभाकर रुंघे , प्रदीप बावने , महेर इंचुलकर , राहुल सोनबरसे , अर्जुन पात्रे , रंजनिश मेश्राम , कु.अनु मेश्राम , सुनिल हारोडे , शुभम नागमोते , हर्षल नेवारे , श्रवण पात्रे , हर्षल ठाकरे , उमेश मेश्राम , बादल मडावी सह आदि नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते .

****

कन्हान शहर विकास मंच डरे शहिदांना श्रद्धांजली

दै,जनप्रभात / नंदू कोल्हे

कन्हान :- जम्मू - काश्मीर मधील पुलवामा येथे झालेल्या दहशतवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या शूर जवानांना कन्हान शहर विकास मंच च्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली .१४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर भारतीय सुरक्षा जवानांना घेऊन जाणाऱ्या सीआरपीएफ वाहनांच्या ताफ्यावर दहशतवाद्यांनी हल्ला केला . ज्या मध्ये देशाचे ४० हून अधिक शूर जवान शहीद झाले होते . जम्मू-काश्मीर मधील पुलवामा जिल्ह्यातील अवंतीपोरा जवळील लेथपोरा भागात हा हल्ला झाला होता . बुधवारी (दि.१४) फेब्रुवारी ला या दहशतवाद्यांच्या हल्ल्याला चार वर्षे पूर्ण झाल्याने कन्हान शहर विकास मंच च्या वतीने तारसा रोड शहीद चौक येथे श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित मंच मार्गदर्शक भरत सावळे , शिक्षक शैलेश सोलंकी यांच्या हस्ते शहिद प्रकाश देशमुख यांच्या प्रतिमेला आणि स्मारकावर पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली . मंच पदाधिकाऱ्यांनी शहीद प्रकाश देशमुख आणि स्मारकावर पुष्प अर्पित करुन व दोन मिनिटाचा मौन पाळून शहिद झालेल्या शूर जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली .या प्रसंगी कन्हान शहर विकास मंच संस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर , मार्गदर्शक भरत सावळे , प्रभाकर रुंघे , प्रदीप बावने , महेर इंचुलकर , राहुल सोनबरसे , अर्जुन पात्रे , रंजनिश मेश्राम , कु.अनु मेश्राम , सुनिल हारोडे , शुभम नागमोते , हर्षल नेवारे , श्रवण पात्रे , हर्षल ठाकरे , उमेश मेश्राम , बादल मडावी सह आदि नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते .

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगांव येथे बाल आनंद मेळाव्याचे आयोजन




दै,जनप्रभात
अतुल दंढारे /तालुका प्रतिनिधी

नरखेड : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगांव (व.) च्या स्वच्छ, सुंदर प्रांगणात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण पिंपळगाव वासियांनी या मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.माधुरी खोडे यांनी करून विद्यार्थ्यांना क्रय-विक्रय धडे देण्यासाठी बाल-आनंद मेळावा आयोजनाचे महत्त्व विषद केले. कार्यक्रमाचे उद्घाटक ग्राम पंचायत सरपंच महेंद्रभाऊ ठाकरे यांनी करून कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी तत्पर असण्याचे सांगून चिमुकल्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा श्रीमती हिराताई गोळूर यांनी भूषविले. तसेच संचालन श्रीमती भावना दातीर यांनी केले. प्रमुख उपस्थितीत उपसरपंच पवनभाऊ लक्षणकर, केंद्रप्रमुख मा. मदन वनकर, ग्राम पंचायत सचिव श्री राऊत, ग्राम पंचायत सर्व सदस्य, श्री.दाभाडे, सेवा शिक्षक पडघन सर, श्री.पाटील सर हेही उपस्थित होते. सर्वांचे आभार मानून सोहळ्याची सांगता करण्यात आली.

****

भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचेवर काँग्रेसचे बंटी शेळके यांनी घृणास्पद वक्तव्य केल्याने कोराडीत जाहिर निषेध

दै,जनप्रभात / कोराडी, :- भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या बद्दल काँग्रेसचे बंटी शेळके यांनी अपमानकारक, नीच घाणेरड्या शब्दात बावनकुळे यांची स्वच्छ प्रतिमा मलिन करण्याचा जो लाजीरवाना प्रकार केला त्याबद्दल दिनांक १७.०२.२४ ला सकाळी ११ वाजता कोराडी पोलीस स्टेशनला वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे यांना काँग्रेसचे बंटी शेळके याला अटक करून त्यांचावर गुन्हा दाखल करण्याचे भाजप पदाधिकाऱ्यांनी निवेदन दिले. याप्रसंगी भाजप महादुला शहर अध्यक्ष प्रितम लोहासारवा, नगराध्यक्ष न. पं. महादुला राजेश संगारी, सरपंच नरेंद्र धानाले, रामबाबु तोडवाल, सारिकाताई झोड, मोसिम शेख, पवन पखीड्डे, स्वप्निल थोटे, विश्वनाथ चव्हाण, ममताताई वरठे, नरेंद्र झोड, अभिजित ढोरे, विजय जैन, अंकित तुरक, राहुल नागदेवे, बापुराव सोनवने, सागर मडावी, अनिल बोरकर, हनुमता लष्करे, गोपाल गोडबोले, अंकुश समरीत, सोनू काळे, अजय साहु, अनिल उमरे, निर्भय बोसने आदी भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४ २२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI No : MAHMAR/2020/82242